




निर्भीड, परखड, वास्तववादी व
परिवर्तनशील विचारसरणीचे....

# दैनिक निशस्त्र योध्दा LIVE

निशस्त्र योध्दा मराठी
आवाज तुमचा, लढा आमचा !

मुख्य संपादक : सुबोध केशवराव आखाडे | www.epapernishastrayoddha.com | TC.NO.MAHMAR/26/A1288 | E-mail : nishastrayoddha@gmail.com | buldhanaupdate.com

मेहकर | शुक्रवार । २० मार्च २०२६ । वर्ष–पहिले । अंक क्र.–०२ । पृष्ठे–४ । किंमत–२ रु. | बुलढाणा । अकोला । वाशिम । यवतमाळ । जालना । छ.संभाजीनगर । अमरावती । धुळे । नंदुरबार । नागपूर । भंडारा येथून एकाचवेळी प्रसिध्द


## Short न्यूज

### खा.बोरदोलोई यांचा भाजपमध्ये प्रवेश

**गुवाहाटी :** आसाममधील विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. नागावचे लोकसभा खासदार आणि पक्षाचा एक अत्यंत विश्वासू चेहरा असलेले प्रद्युत बोरदोलोई यांनी अचानक आपल्या पदाचा आणि सदस्यत्वाचा राजीनामा देऊन सर्वांना आश्चर्यचकीत केले आहे. बुधवारी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला असून विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आता काँग्रेसमध्ये खळबळ उडाली आहे. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपली खदखद व्यक्त केली आहे. त्यांचा हा राजीनामा एका रात्रीत घेतलेला निर्णय नसून दीर्घकाळापासून खदखदत असलेल्या असंतोषाचे कारण असल्याचे दिसते.


### खा.बोरदोलोई यांचा भाजपमध्ये प्रवेश

**गुवाहाटी :** आसाममधील विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे. नागावचे लोकसभा खासदार आणि पक्षाचा एक अत्यंत विश्वासू चेहरा असलेले प्रद्युत बोरदोलोई यांनी अचानक आपल्या पदाचा आणि सदस्यत्वाचा राजीनामा देऊन सर्वांना आश्चर्यचकीत केले आहे. बुधवारी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला असून विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आता काँग्रेसमध्ये खळबळ उडाली आहे. पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपली खदखद व्यक्त केली आहे. त्यांचा हा राजीनामा एका रात्रीत घेतलेला निर्णय नसून दीर्घकाळापासून खदखदत असलेल्या असंतोषाचे कारण असल्याचे दिसते.


### ‘जल जीवन मिशन २.०’ साठी करार

**नागपूर :** राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीचे डिसेंबर 2028 पर्यंत ‘हर घर जल’ प्रमाणीकरण साध्य करणे तसेच पाणी पुरवठा योजनांचे सक्षम संचलन आणि देखभाल सुनिश्चित करण्याची प्रमुख उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेऊन केंद्र सरकारचे जलशक्ती मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्यात गुरुवारी नवी दिल्ली येथे सामंजस्य करार पार पडला. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपुरातून दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. केंद्रीय मंत्रिमंडळाने अलिकडेच ‘जल जीवन मिशन’ कार्यक्रमास डिसेंबर 2028 पर्यंत मुदतवाढ दिली असून या नवीन टप्प्याला ‘जल जीवन मिशन-2.0’ असे संबोधण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने राज्यांनी संरचनात्मक सुधारणा, कालमर्यादेचे पालन, योजनांची शाश्वतता आणि नागरीक-केंद्रित सेवांचे वितरण सुनिश्चित करण्यासाठी हा सामंजस्य करार पार पडला.

## अशोक खरात प्रकरणात सरकारचा निर्णय

# तीन गुन्ह्यांच्या तपासासाठी एसआयटी स्थापन

■ नाशिक/वृत्तसंस्था

नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या स्वयंघोषित अंकशास्त्रज्ञ 'कॅप्टन' अशोक खरात याच्या कृत्यांचा छडा लावण्यासाठी राज्य सरकारने आता कंबर कसली आहे. या प्रकरणाच्या निष्पक्ष आणि सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आली असून, या पथकाच्या प्रमुखपदी तडफदार महिला आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आता खरातच्या राजकीय आणि धार्मिक संबंधांसह शोषणाच्या रॅकेटचे धागेदोरे उघड होण्याची शक्यता आहे.

राज्य गृह विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, अशोक खरात याच्याविरुद्ध नाशिक शहर, नाशिक ग्रामीण आणि अहिल्यानगर (शिर्डी) येथे नोंदवलेल्या तीन स्वतंत्र गुन्ह्यांचा तपास आता 'एसआयटी' मार्फत एकत्रितपणे केला जाईल. महाराष्ट्र पोलिस मुख्यालयाने या प्रकरणातील सर्व केस डायरी, पुरावे आणि जप्त केलेले साहित्य तातडीने या विशेष पथकाकडे सोपवण्याचे आदेश दिले आहेत.



**कॅप्टन अशोक खरातला 23 तारखेपर्यंत पोलिस कोठडी..** कॅप्टन अशोक खरात याला गंभीर लैंगिक अत्याचाराच्या आरोपाखाली अटक झाल्याने शहरात मोठी खळबळ उडाली आहे. धार्मिक श्रद्धा, दैवी शक्ती आणि मंत्रतंत्र यांचा आधार घेत महिलांचा विश्वास संपादन करून त्यांच्यावर अत्याचार केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी पहाटे कारवाई करत त्याला ताब्यात घेतले असून न्यायालयाने त्याला 23 तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या घटनेमुळे समाजात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### खरातवर तीन पोलिस ठाण्यात वेगवेगळे गुन्हे

■ अशोक खरात याच्यावर नाशिकच्या सरकारवाडा पोलिस ठाण्यात एका ३५ वर्षीय महिलेवर लैंगिक शोषण आणि बलात्काराचा आरोपाचा गुन्हा दाखल आहे. नाशिक ग्रामीणच्या वावी पोलिस ठाण्यात अश्लील व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन ५ कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा गुन्हा दाखल आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी पोलिस ठाण्यात पीडितेचे वैयक्तिक फोटो सोशल मीडियावर प्रसारित केल्याचा आरोपाचा गुन्हा दाखल आहे.

# सौदी तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हल्ला : यूएई-कतार तेल आणि वायू प्रकल्पावर ड्रोन हल्ला

■ तेल अवीव/वृत्तसंस्था

इस्त्रायलने गॅसफिल्डवर हल्ला केल्यानंतर इराणने प्रतिहल्ला करत सौदी अरेबिया, कुवेत, कतार आणि यूएईमध्ये गॅस सुविधा आणि ऑईल रिफानयरींवर मिसाईली तसेच ड्रोनचा मारा केला आहे. सौदी अरेबियातील यान्बू बंदरात असलेल्या समरेफ तेल शुद्धीकरण प्रकल्पावर हवाई हल्ला झाला. त्यामुळे भयंकर टप्प्यावर पोहचल्याचे दिसत आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी बंद असल्यामुळे, बहुतेक तेल आता यान्बू बंदरातून पाठवले जात आहे. याशिवाय, संयुक्त अरब अमिराती (यूएई) आणि कतारमधील तेल आणि वायू प्रकल्पांवर ड्रोन हल्ले झाले. इराणने सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कतारमधील तेल प्रकल्पांची राख करण्याचा इशारा दिला आहे. इराणच्या आक्रमक पावित्र्यानंतर सौदीने गुरूवारी इराणला कडक इशारा दिला आहे. सौदीचे परराष्ट्र मंत्री फैसल बिन फरहान अल सौद म्हणाले की, इराणला प्रत्युत्तर देण्याची आमच्या देशात पूर्ण ताकद आहे. इराणचे हल्ले पूर्वनियोजित असल्याचे दिसते आणि त्यांनी आमच्या संयमाची परीक्षा घेऊ नये.



कतारने माहिती दिली की, इराणच्या क्षेपणास्त्रांनी देशातील मुख्य गॅस सुविधा असलेल्या 'रास लाफान'वर हल्ला केला. यामध्ये प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले आहे. कुवेत पेट्रोलियम कॉर्पोरेशनने सांगितले की, कुवेत शहरापासून 50 किमी दक्षिणेला असलेल्या 'मिना अल-अहमदी' रिफायनरीवर ड्रोन हल्ला झाला. यामुळे एका ऑपरेशनल युनिटला आग लागली, सुदैवाने जिवितहानी झाली नाही. कुवेतच्या दक्षिणेकडील 'मिना अब्दुल्ला' रिफायनरीवरही ड्रोनने हल्ला केल्यामुळे तिथे आग लागल्याची माहिती कुवेत पेट्रोलियम कॉर्पोरेशनने दिली. संयुक्त अरब अमिरातीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, त्यांनी रोखलेल्या क्षेपणास्त्रांचे अवशेष पडल्यामुळे हबशान गॅस सुविधा आणि बाब ऑईलफिल्डमध्ये काही दुर्घटना घडल्या. सौदी अरेबियाच्या संरक्षण मंत्रालयाने माहिती दिली की, यानबू बंदरावरील सौदी अरामकोच्या 'सामरेफ' रिफायनरीवर एक ड्रोन आदळले. या हल्ल्यात झालेल्या नुकसानीचा अंदाज सध्या घेतला जात आहे. आखाती प्रदेशातील ऊर्जा प्रकल्पांवरील हल्ल्यांमध्ये वाढ झाल्याने गुरुवारी युरोपमध्ये नैसर्गिक वायूच्या किमतीत 35 टक्के वाढ झाली. 28 फेब्रुवारी रोजी इराण युद्ध सुरू झाल्यापासून युरोपमध्ये वायूच्या किमती 60 टक्क्यांपेक्षा जास्त वाढल्या आहेत. अमेरिकेच्या गुप्तचर प्रमुख तुलसी गबार्ड यांनी म्हटले आहे की, इराणने आपला अणुकार्यक्रम पुन्हा सुरू केलेला नाही, जो गेल्या जूनमधील हल्ल्यानंतर जवळजवळ नष्ट झाला होता. हे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या दाव्यांच्या विरोधात आहे. ट्रम्प यांनी सातत्याने म्हटले आहे की इराणचा अणुकार्यक्रम धोकादायक आहे आणि अलीकडील युद्ध आवश्यक होते.

## ११ जहाल नक्षल्यांचे आत्मसमर्पण

■ गडचिरोली/वृत्तसंस्था

विविध दलममध्ये कार्यरत ११ जहाल नक्षल्यांनी गुरूवारी गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले. त्यात १ विभागीय समिती सदस्य, एक क्षेत्र समिती सचिव, एक प्लाटून पार्टी सदस्य, १ कमांडर, १ क्षेत्र समिती सदस्य आणि अन्य सहा दलम सदस्यांचा समावेश आहे. पोलिसांनी त्यांच्यावर एकूण ६८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर होते.

सोनी उर्फ बाली वत्ते मट्टामी, बुदरी उर्फ रामबत्ती आयतू मट्टामी, सुखलाल बोळगा कोक्सा, शांती उर्फ सोमरी गंगा तेलामी, यमुनक्का उर्फ रुखमाक्का पेंदाम, गणेश कोवासी, मिनको उर्फ जमनी काऱ्या मट्टामी, धनू दसरु वेळंजे, सुनीता उर्फ वंगे वत्ते होयाम, रमेश पांडू मडावी आणि किशोर सुक्रय्या वासम यांचा आत्मसमर्पण करणाऱ्यांमध्ये समावेश आहे. नक्षल आत्मसमर्पण योजना सुरु झाल्यापासून आजतागायत ७४९, तर २०२५ पासून १२३ नक्षल्यांनी आत्मसमर्पण केले आहे. सोनी मट्टामी(४५) ही छत्तीसगडमधील रहिवासी असून, तेथील कुतुल दलमची विभागीय समिती सदस्य होती. २००० पासून ती नक्षल चळवळीत कार्यरत होती. बुदरी मट्टामी(४०) ही देखील छत्तीसगडची रहिवासी आहे.




# होर्मुझ परिसरात पाठवणार भारताच्या युद्धनौका

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

इराणच्या आखातातील होर्मुझ सामुद्रधुनी परिसरात भारताने आणखी युद्धनौका पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. या सामुद्रधुनीतून आता भारताच्या तेलवाहक नौका येऊ लागल्या आहेत. या नौकांना अधिक संरक्षण देण्यासाठी भारताने हे महत्वाचे पाऊल उचलले आहे. गेल्या सहा दिवसांमध्ये दोन इंधनवायू वाहन नौका आणि दोन तेलवाहक नौका या सामुद्रधुनीतून सुखरुपपणे भारतात आल्या आहेत.

अद्यापही 18 भारतीय ऊर्जावाहक नौका होर्मुझ परिसरात अडकून पडल्या आहेत. त्यांना ही सामुद्रधुनी पार करण्याची अनुमती इराणकडून मिळविण्यासाठी भारताच्या परराष्ट्र विभागाचे सातत्याने प्रयत्न होत आहेत. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी इराणच्या परराष्ट्र व्यवहार विभागाशी सातत्याने संपर्क राखला आहे. त्यामुळे इराणने आतापर्यंत चार नौकांना ही सामुद्रधुनी ओलांडण्याची अनुमती दिली. इतरही सर्व नौका लवकरच भारतात येतील अशी शक्यता आहे.

### तेलवाहक नौकांना अधिक संरक्षण देण्यासाठी व्यूह



**यापूर्वीच दोन नौका नियुक्त..** भारताच्या नौकांना अनुमती मिळाल्यानंतर त्यांच्या संरक्षणासाठी भारताने दोन भारतीय नौदलाच्या दोन युद्धनौकांची नियुक्ती केलेली होती. आता ही संख्या वाढविण्यात येणार आहे. भारत आपल्या अधिकाधिक तेलवाहक नौका लवकरात लवकर या सामुद्रधुनीतून भारतात घेऊन येण्याची इच्छा बाळगून आहे. इराणने या नौकांना अनुमती दिली, तरी त्यांना समुद्रचाच्यांच्या टोळ्यांपासून धोका संभवू शकतो. त्यामुळे त्यांना संरक्षण देण्याची अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली आहे.

इस्रायलने बुधवारी संध्याकाळी इराणच्या एका इंधन वायू उत्पादन केंद्रावर हल्ला केला आहे. या हल्ल्यामुळे या केंद्राचे कामकाज थांबविण्यात आले. इराणच्या दक्षिणेला असणाऱ्या पार्स नामक या केंद्रावर इस्रायलच्या युद्धविमानांनी बॉंबफेक केली. या हल्ल्यात या केंद्राची मोठ्या प्रमाणात हानी झाल्याचे वृत्त आहे. या केंद्राचे काम आता बंद करण्यात आले असून ते केव्हा पुन्हा कार्यरत होणार, या विषयी कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. या केंद्रातून इराणला त्याच्या अंतर्गत ऊर्जेचा पुरवठा केला जात होता. आता हे केंद्र बंद झाल्याने इराणमध्येच इंधन वायूची टंचाई निर्माण होण्याची शक्यता काही जणांनी व्यक्त केली आहे.

**युद्ध थांबविण्याचे आवाहन..** हे युद्ध लवकरात लवकर थांबवा, असे आवाहन काही युरोपियन देशांनीही केले आहे. या युद्धामुळे केवळ इंधनाची नव्हे, तर अन्य आवश्यक वस्तूंचीही टंचाई निर्माण होऊ शकते. तसे झाल्यास जगभर मोठ्या प्रमाणात सर्वसामान्यांना त्रासाला तोंड द्यावे लागू शकते, असे प्रतिपादन अनेक तज्ज्ञांनी केले. जगातील सर्व राष्ट्रप्रमुखांनी या संदर्भात पुढाकार घेऊन युद्धमान देशांना परिस्थिती समजावून सांगावी आणि त्यांना युद्धापासून परावृत्त करावे, असे मत जगभरात व्यक्त केले जात आहे.

# मोदींच्या उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक; कच्च्या तेलाच्या पुरवठ्याबाबत पेट्रोलियम मंत्र्यांशी चर्चा

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

युद्धाच्या इराण-इस्त्रायल-अमेरिका पार्श्वभूमीवर भारताला एलपीजी सिलिंडरच्या सततच्या तुटवड्याचा आहे. सामना करावा लागत याचदरम्यान, केंद्र सरकारने राज्यांना १० टक्के वाढीव एलपीजी कोटा देण्याचे बुधवारी जाहीर केले. तसेच राज्यांना काही महत्त्वाच्या सूचना करण्यात आल्या असून पीएनजीवरून एलपीजीकडे टप्याटप्याने वाटचाल करण्यास सांगितले आहे. दरम्यान, वाढत्या एलपीजी टंचाईच्या पार्श्वभूमीवर बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्यासोबत कच्चे तेल आणि गॅस पुरवठ्यासंदर्भात बैठक घेतली. या बैठकीत कच्चे तेल आणि गॅसची उपलब्धता, त्यांची आयात आणि संभाव्य संकटाचा सामना करण्याच्या धोरणांवर चर्चा झाली. देशांतर्गत एलपीजी उत्पादनात ४० टक्के वाढ झाली आहे, परंतु परिस्थितीत पूर्णपणे सुधारणा झालेली नाही.

### युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतात एलपीजीचा तुटवडा



एलपीजीचा तुटवडा कायम आहे. ऑनलाइन बुकिंगमध्ये सुधारणा झाली आहे, परंतु वितरकांकडे लांबच लांब रांगा कायम आहेत, असे पेट्रोलियम मंत्रालयाच्या अधिकारी सुजाता शर्मा यांनी बुधवारी सांगितले. १५ राज्यांमध्ये व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरू असून, गेल्या चार दिवसांत अंदाजे ७,२०० टन गॅस वितरित करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले. देशात तेल आणि गॅसचा पुरेसा साठा असल्याचा सरकारचा दावा आहे. विमान इंधनाची (एटीएफ) कमतरता नाही. तसेच पेट्रोल आणि डिझेलच्या दरात अद्याप वाढ झालेली नसल्यामुळे जनतेला दिलासा मिळाला आहे. सरकारने लोकांना अफवांकडे दुर्लक्ष करून एजन्सींना भेट देणे टाळून केवळ अधिकृत ॲप किंवा वेबसाइटवरूनच बुकिंग करण्याचे आवाहन केले आहे.

# नोएडा विमानतळाचे २८ मार्चला होणार उद्घाटन

■ नोएडा/वृत्तसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी 28 मार्च रोजी नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन करतील. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी बुधवारी आपल्या सरकारच्या नऊ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळाच्या पूर्ततेनिमित्त आयोजित एका समारंभात ही घोषणा केली. या माध्यमातून देशातील सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतीक्षा आता संपणार आहे. राज्यात सध्या 16 देशांतर्गत आणि चार आंतरराष्ट्रीय विमानतळे आहेत. नोएडा-जेवर येथील विमानतळ हे राज्यातील पाचवे आणि देशातील सर्वात मोठे आंतरराष्ट्रीय विमानतळ ठरणार आहे. जेवर विमानतळाला उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेसाठी ‘गेम-चेंजर’ संबोधून मुख्यमंत्र्यांनी यातून भविष्यात 1 लाख कोटी रुपयांचा महसूल मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थिती बुधवारी सरकारच्या नऊ वर्षांच्या कार्यकाळातील कामगिरीचा तपशील देणाऱ्या एका पुस्तकाचेही प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, गेल्या नऊ वर्षांत राज्यात झालेले सर्व बदल हे पंतप्रधान मोदींचे मार्गदर्शन आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे फळ आहे. कायदा आणि सुव्यवस्थेवर भर देताना ते म्हणाले की, आज रमजानचा महिना आहे. लवकरच ईद येणार आहे, तरीही कुठेही अशांतता किंवा दंगलीची भीती नाही. हेच सुशासन आहे. 2017 पूर्वी पोलीस भरती थांबली होती, परंतु त्यांच्या सरकारने पारदर्शकपणे 2.19 लाख पोलीस कर्मचाऱ्यांची भरती केली आहे आणि सध्या 60,240 कर्मचारी प्रशिक्षण घेत असल्याचेही ते म्हणाले.





मागील सरकारांवर टीका करताना ते म्हणाले की, काही लोक नोएडाला जायला घाबरत होते, पण त्यांच्या सरकारने तिथे जाऊन गुंतवणुकीचे वातावरण निर्माण केले. आज देशातील 55 टक्के मोबाईल फोन नोएडामध्ये तयार होतात. उत्तर प्रदेशात आता 16 देशांतर्गत आणि 5 आंतरराष्ट्रीय विमानतळांचे जाळे असून, जेवर हे पाचवे आणि सर्वात मोठे विमानतळ होणार असल्याचा सरकार अभिमान आहे, असेही ते पुढे म्हणाले.

भारताच्या ‘ऑपरेशन संकल्प’ला मोठे यश | युएईमधून ८०.८८६ मेट्रिक टन कच्चे तेल पोहोचले

# ‘जग लाडकी’ तेलवाहू जहाज गुजरातमध्ये दाखल

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

भारतीय ध्वज असलेले तेलवाहू जहाज ‘जग लाडकी’ गुजरातच्या मुंद्रा येथील अदानी पोर्टवर दाखल झाले आहे. ते संयुक्त अरब अमिरातीच्या (युएई) फुजैरा बंदरातून होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून आले आहे. या जहाजात 80,886 मेट्रिक टन (अंदाजे 5.80 ते 6.0 लाख बॅरल) कच्चे तेल आहे. भारताला दररोज अंदाजे 5.5-5.6 दशलक्ष बॅरल (अंदाजे 90 कोटी लिटर) तेलाचा वापर होतो.

‘जग लाडकी’ हे कार्गो जहाज संयुक्त अरब अमिरातीमधील फुजैरा बंदरावर तेलसाठा भरून पाठण्यात आले आहे. या जहाजाची लांबी 274.19 मीटर आणि रुंदी 50.04 मीटर आहे. या टँकरचे डेडवेट टनेज (एकूण भार वाहून नेण्याची क्षमता) अंदाजे 1,64,716 टन आणि ग्रॉस टनेज अंदाजे 84,735 टन आहे. भारतात यापूर्वी 16 आणि 17 मार्च रोजी दोन भारतीय ध्वजांकित एलपीजी वाहक जहाजे दाखल झाली होती. भारतात दाखल होण्यापूर्वी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षितपणे ती पार झाली होती. एमटी शिवालिक आणि एमटी नंदा देवी या जहाजांमधून अंदाजे 92,712 मेट्रिक टन एलपीजी घेऊन होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास केला होता. आपल्या व्यावसायिक हितांचे रक्षण करण्यासाठी, भारत ‘ऑपरेशन संकल्प’ अंतर्गत या प्रदेशातील पाण्यात सतत नौदल उपस्थिती राखतो. हा उपक्रम महत्त्वाच्या सागरी मार्गांचे संरक्षण करण्यासाठी आणि ‘जग लाडकी’सारख्या जहाजांना सुरक्षित मार्ग मोकळा करून देण्याची खात्री करण्यासाठी समर्पित आहे





### संयुक्त राष्ट्रांची सागरी संघटना बैठक घेणार

■ संयुक्त राष्ट्रांची सागरी संघटना (आयएमओ) आखाती प्रदेशातील परिस्थितीवर लवकरच एक तातडीची बैठक घेणार आहे. युद्धामुळे जहाजे आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याने ही बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत अनेक देश सहभागी होणार असून, मोठे निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे. इराणचे हल्ले आणि होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याच्या प्रयत्नांचा निषेध व्हावा, अशी ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी आणि आखाती देशांची इच्छा आहे. दरम्यान, जपान, पनामा, सिंगापूर आणि संयुक्त अरब अमिरातीसारख्या देशांना अडकलेली जहाजे आणि खलाशी यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी एक योग्य योजना तयार व्हावी असे वाटते. दुसरीकडे, या परिस्थितीसाठी अमेरिका आणि इस्रायल जबाबदार असल्याचे इराणचे म्हणणे आहे. समुद्रातील वाढलेल्या धोक्याला इस्रायल आणि अमेरिका कारणीभूत असल्याचा आरोप इराणने वेळोवेळी केलेला आहे.

नववर्षाचे स्वागत ..वाजत गाजत..





बुलढाणा : योगांजली योग वर्गातील महिला साधकांनी योग वर्गात मराठी नववर्षाच्या निमित्ताने पारंपारिक पद्धतीने गुढी उभारून पूजन केले. याप्रसंगी महिला योग साधिकांनी मराठी गीतांवर नृत्य करून नववर्षाचे वाजत गाजत स्वागत केले. (छायाचित्र : रविकिरण ढाकळकर)

# जिल्ह्यात गारपिटीसह अवकाळी पाऊस; पिकांचे प्रचंड नुकसान

## वृक्ष उन्मळून पडले; घरांवरील पत्रे उडाली, शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला

**बुलढाणा (जिमाका)**

बुलढाणा : मागील काही दिवसांपासून तापमान वाढीमुळे नागरिक त्रस्त झालेले असतानाच 18 मार्चपासून वातावरणात अचानक बदल झाला. काही भागात 18 मार्चच्या रात्री विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. 19 मार्चला बुलढाणा, मेहकर, डोणगाव, चिखली व लोणार तालुक्यात गारपीट आणि अवकाळी पावसाने तडाखा दिला. यामध्ये शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे आतोनात नुकसान झाले.

लोणार तालुक्यातील काही गावांना पावसाने झोडपलं. तालुक्यातील काही भागात वाऱ्यासह गारांचा पाऊस बरसला. काही वेळ बरसलेल्या पावसाने परिसरात पाणीच पाणी झाले. अचानक आलेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे अवकाळी पाऊस आणि गारपिटीने कांदा, गहू हरबरा नेट शेड आंबा यांच्यव सह अन्य पिकांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वझर आघाव, कासारी, येवती, चिंचोली सांगळे, पारडा दराडे, देऊळगाव कुंडपाळ, खुरमपूर, अजिसपुर, धायफळ या भागात पाऊस व गारपीट झाली. नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश तहसिलदार, बिडीओ, तलाठी व ग्रामसेवक यांना देण्यात यावे अशी मागणी शिवछत्र मित्र मंडळ संस्थापक अध्यक्ष नंदु मापारी यांनी केली.



**सोसाट्याचा वारा अन् विजांच्या कडकडाटासह दीड तास झोडपले!**

**धाड :** गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या असह्य उकाड्यानंतर, आज १९ मार्चच्या रात्री ८.३० वाजता नंतर धाड परिसराला निसर्गाच्या भीषण कोपाचा सामना करावा लागला. अचानक आलेल्या अवकाळी पावसाने विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह तब्बल दीड तास चांगलेच थैमान घातले. या वादळी पावसाने जनजीवन विस्कळीत केले असून, मोठ्या प्रमाणावर मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

सायंकाळच्या सुमारास आकाशात अचानक काळेकुट्ट ढग जमा झाले आणि पाहता पाहता वातावरणात बदल झाला. सोसाट्याचा वारा इतका वेगवान होता की, अनेक भागांत धुळीचे लोट उसळले. त्यानंतर सुरू झालेल्या पावसाने दीड तास विश्रांती न घेता धाड शहरासह परिसरातील खेड्यापाड्यांना झोडपून काढले. वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने अनेक घरांवरील टिनपत्रे कागदासारखी हवेत उडून गेली, ज्यामुळे अनेक कुटुंबे उघड्यावर आली आहेत. रस्त्याच्या कडेला असलेले जुने वृक्ष उन्मळून पडल्याची माहिती आहे. सुदैवाने, वृक्ष कोसळल्याच्या घटनांत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

पाऊस सुरू होताच खबरदारीचा उपाय म्हणून आणि अनेक ठिकाणी विजेच्या तारांवर झाडांच्या फांद्या पडल्याने विद्युत पुरवठा खंडित झाला. वादळ शमल्यानंतरही उशिरापर्यंत वीजपुरवठा सुरळीत झाला नव्हता, त्यामुळे संपूर्ण परिसर अंधारात बुडाला होता. महावितरणच्या कर्मचाऱ्यांना दुरुस्तीच्या कामात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका शेतकरी वर्गाला बसला आहे. सध्या शेतात काढणीला आलेली पिके या पावसाने मातीमोल केली आहेत. कापणीला आलेल्या पिकांचे आणि उन्हाळी पिकांचे या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे.

**चिखली परिसरात गारपिटीसह अवकाळी पाऊस**

**चिखली :** शहर परिसरात वातावरणात अचानक बदल होऊन विजेच्या कडकडाटासह जोरदार अवकाळी पाऊस व गारपिटीला सुरुवात झाली. दुपारी अडीच ते पावणेतीन वाजेच्या सुमारास सुरुवातीला पावसाने मोठे थेंब पडले व नंतर लहान आकाराच्या गाडी सुमारे पंधरा मिनिटे पडल्यामुळे झाडावरील पाने गळून पडली होती. अचानकपणे आलेल्या गारपीट व पावसामुळे नागरिकांची एकच धांदल उडाली होती.

गेल्या काही दिवसांपासून हवामान खात्यासह विविध हवामान अंदाज व्यक्त करणाऱ्या व्यक्तीकडून मार्च महिना अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात येत होता. त्यानुसार 17 ते 22 मार्च दरम्यान विदर्भ व मराठवाड्यातील काही भागांना अवकाळी पाऊस तसेच गारपिटीचा फटका बसण्याचा अंदाज वर्तविला होता. 19 मार्च रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत कडकडीत ऊन होते मात्र अडीच ते पावणेतीन वाजेच्या सुमारास अचानकपणे वातावरणात बदल झाला. पाऊस व गारपिटीमुळे नागरिकाची एकच धांदल उडाली असून गहू, हरभरा, कांदा बीज तसेच शेती पिकासह फळबाग आणि आंबा पिकावर मात्र याचा विपरीत परिणाम नक्कीच दिसून येणार आहे.

## Short न्यूज

### रिपाइं जिल्हा संघटन संपर्क प्रमुखपदी खरात

**अंढेरा :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) बुलढाणा जिल्हा दक्षिण (घाटावरील) व उत्तर (घाटाखालील) भागासाठी संघटन संपर्क प्रमुखपदी देऊळगाव राजा येथील इंजिनियर शरद खरात यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आदेशाद्वारे ही निवड जाहीर केली. शरद खरात हे पक्षनिष्ठ, स्वाभिमानी व सातत्याने समाजकार्यात सक्रिय असलेले कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. सामाजिक, राजकीय तसेच धार्मिक क्षेत्रात त्यांनी जिल्हाभर कार्य करत अनेक गरजू नागरिकांना मदतीचा हात दिला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर ही महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे.

### डी. डी. वायाळ यांची अमरावती विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती

**बुलढाणा :** बुलढाणा पंचायत समितीचे माजी गटशिक्षणाधिकारी श्री डी. डी. वायाळ यांची जिल्हा परिषद माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक संघ, हिंगोली या राज्यव्यापी संघटनेच्या अमरावती विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राज्याध्यक्ष फुलकामकर यांनी जाहीर केली

### जुगारावर पोलिसांचा छापा; एकास अटक

**बुलढाणा :** शहरातील भिलवाडा परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्डयावर बुलडाणा शहर पोलिसांनी धाड टाकून एका आरोपीस अटक केली. शहिस्ता किराणा दुकानाजवळ सार्वजनिक ठिकाणी जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. संबंधित व्यक्ती नागरिकांकडून पैसे स्वीकारून त्यांना मटक्याच्या आकड्यांच्या चिठ्ठ्या देत जुगार चालवत होता. पोलिस पथक घटनास्थळी पोहोचताच काही जणांनी पळ काढला, मात्र मुख्य आरोपीला जागीच पकडण्यात पोलिसांना यश आले. चौकशीअंती त्याचे नाव शेख मुस्तकीम शेख सलीम (वय ३२, रा. भिलवाडा, बुलडाणा) असे असल्याचे समोर आले. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या अंगझडतीत आरोपीकडून मटक्याच्या आकड्यांच्या चिठ्ठ्या, एक पेन, कागदाचा तुकडा तसेच १,०२० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली.

### बोगस बियाणे विकून फसवणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करा!

**चिखली :** प्रसिद्ध बियाणे कंपनीने शेतकऱ्यांना बोगस बियाणे विकून फसवणूक केल्याचा प्रकार गत महिन्यात तालुक्यात उघडकीस आला होता. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. हा मुद्दा आमदार श्वेता महालेंनी विधिमंडळात औचित्याच्या मुद्दाद्वारे उपस्थित करून बोगस बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करावी व नुकसान भरपाई वसूल करण्याची मागणी केली आहे. तालुक्यातील एकलारा, शिरपूर, धाड येथील येथील १३ शेतकऱ्यांनी एका कंपनीच्या मका बियाणे बीज उत्पादन कार्यक्रमांतर्गत मका पिकाची लागवड केली आहे. यासाठी कंपनीने दोन्ही गावांतील शेतकऱ्यांना मका बियाणे दिले. याप्रकरणी शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे.

## डोणगावमध्ये सुडी झाकण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा मृत्यू

**डोणगाव/प्रतिनिधी**

परिसरात गुरूवारी अचानक वातावरणात बदल झाला. त्यामुळे शेतकऱ्यांची एकच धांदल उडाली. या दरम्यान डोणगाव परिसरात तीन ठिकाणी वीज पडल्याच्या घटना घडल्या. एका घटनेत सुडी झाकण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा विजेच्या प्रचंड आवाजामुळे हृदय विकाराचा झटका आल्याने मृत्यू झाला.



19 मार्च रोजी सकाळी 7 वाजे दरम्यान डोणगाव परिसरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. पावसाचे वातावरण नसल्याने काही शेतकऱ्यांनी सुड्या झाकून ठेवल्या नव्हत्या. वातावरणात अचानक झालेला बदल पाहून काही शेतकऱ्यांनी सकाळी शेताकडे धाव घेतली. डोणगाव येथील एकनाथ शिवराम आखाडे वय 55 वर्ष व त्यांचा मुलगा हरभऱ्याची सुडी झाकण्यासाठी शेतात गेले. सुडी झाकण्याच्या धावपळीमध्ये विजांचा कडकडाट सुरू होता. शेताच्या बाजूलाच कुठेतरी वीज पडली. विजेचा प्रचंड मोठा आवाज ऐकताच त्यांना चक्कर आली. त्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले असता त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. आरेगाव रोडवर खंडोबा मंदिराच्या कळसावर वीज पडली. मात्र कोणतीही इजा झाली नाही. मंदिराच्या कळसाचा थोडासा भाग उखडला. याच परिसरातील गौरव तिफने यांच्या घरावर वीज पडल्याने भितीचा काही भाग कोसळला व घरातील सर्व विद्युत उपकरणे जळाली. सोबतच डोणगाव येथील काहींच्या घरातील विद्युत उपकरणेही जळाली.

## गॅस एजन्सीवर गॅस सिलेंडरसाठी रांग

**बुलढाणा/प्रतिनिधी**

एकेकाळी घरपोच गॅस सेवा देणारी बुलढाणा येथील इंडेन गॅस एजन्सी सध्या मात्र नागरिकांच्या रोषाला सामोरी जात आहे. अगोदर सहजपणे घरपोच मिळणारा गॅस आता मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आज पाडव्याच्या सणाच्या दिवशीही गॅस मिळण्यात अडचणी येत असल्याने अनेक कुटुंबांचा सण अंधारात जाण्याची वेळ आली आहे. 'बुकिंग करूनही २४ तास गॅस मिळणार नाही, असे एजन्सीकडून सांगितले जात आहे,' अशी तक्रार केशरबाई हिवाळे यांनी व्यक्त केली. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. एजन्सीकडून कच्च्या पावत्या दिल्या जात असल्याची बाबही समोर आली आहे. 'साईट प्रॉब्लेम'चे कारण देत ग्राहकांना दोन ते तीन तास थांबण्याचे संकेत दिले जात आहेत. परिणामी, एजन्सीसमोर नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून गोंधळाचे चित्र निर्माण झाले आहे.

## शनिवारी 'श्री संत सावता माळी क्रिकेट प्रीमियर लीग २०२६'चा भव्य बक्षीस वितरण सोहळा

**चिखली/प्रतिनिधी**

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर सुरू झालेल्या "श्री संत सावता माळी क्रिकेट प्रीमियर लीग २०२६" या बहुचर्चित क्रिकेट स्पर्धेचा समारोप व बक्षीस वितरण सोहळा २१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता चिखली येथील जिल्हा परिषद मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या बक्षीस वितरण सोहळ्याला जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल भाऊ बोंद्रे, जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाच्या काँग्रेस पक्षाच्या प्रमुख स्वातीताई वाकेकर, काँग्रेस सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष दीपक देशमाने यांची विशेष उपस्थिती लाभणार असून



त्यांच्या हस्ते विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक पारितोषिके, ट्रॉफी व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहेत. याशिवाय उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, मालिकावीर आणि उदयोन्मुख खेळाडू यांनाही विशेष पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये एकूण ८ संघांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रथमेश-११ (अनिल जैवाळ), डीके बॉईज ११ (दीपक खरात), भूमिपुत्र-११ (विलास घोलप )नन्हाई स्ट्रायकर्स (विलास नन्हई), श्री कार्डेकोर (स्वप्नील खरात), एएस रॉयल्स (मंगेश जागृत/ रोहन मेहेत्रे), सातपुडा स्ट्रायकर्स (शैलेश भराड) आणि श्रीराम-११ (समाधान बांडे) या संघांचा सहभाग आहे. व्यावसायिक, राजकीय, शैक्षणिक, डॉक्टर, इंजिनिअर, वकील, शेतकरी, व्यापारी, पत्रकार अशा विविध क्षेत्रातील मान्यवर या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. प्रत्येक संघात स्थानिक तसेच अनुभवी खेळाडूंचा समावेश असल्यामुळे सामने अत्यंत चुरशीचे व रोमांचक ठरत आहे. प्रथम पारितोषिक योगेश भाऊ जाधव यांच्यावतीने 21 हजार तर द्वितीय बक्षीस दीपक भाऊ देशमाने यांच्यावतीने 11हजार रुपये असणार आहे. या बक्षीस वितरण सोहळ्याला पप्पू सेठ हरलालका, माजी नगराध्यक्ष, सौ.प्रिया कुणाल बोंद्रे माजी नगराध्यक्षा डॉक्टर मोहम्मद इसरार विरोधी पक्षनेता, नगरसेवक मोहम्मद आसिफ भाई, उबेद अली खान, रत्नदीप शिनगारे, नगरसेविका सौ सरस्वती वायाळ, श्रीमती सुनिताताई शिंगणे, सौ स्वाती अमोल लहाने, सौ सीमा गोपाल देव्हडे, सौ शितल संतोष देशमुख, सौ संध्या आनंद बोंद्रे, वहिदा बेगम मोहम्मद जकाऊल्ला, सौ सुप्रिया प्रशांत भटकर यांची उपस्थिती राहणार आहे.

## हतेडीत माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात


**बुलढाणा :** हतेडी बु. येथे १४ मार्च रोजी श्री शिवाजी हायस्कूलमध्ये माजी विद्यार्थी स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला, आमदार संजय गायकवाड यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी आमदार गायकवाड यांनी माजी विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांशी संवाद साधत शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेच्या प्रगतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले. अशा स्नेहमेळाव्यांमुळे माजी विद्यार्थी व शाळा यांच्यातील नातं अधिक दृढ होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक अनुपमा जाधव यांनी केले, प्रास्ताविकात मुख्याध्यापक अनुपमा जाधव यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगितला.अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य बाबासाहेब भोंडे होते.

## मेहकरचे आराध्य दैवत श्री शारंगधर बालाजी चरणी फळांची नयनरम्य आरास

**मेहकर/प्रतिनिधी**

नूतन वर्षाचे स्वागत आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्याचा उत्साह आज सर्वत्र पाहायला मिळाला. याच शुभमुहूर्तावर, मेहकर नगरीचे वैभव आणि जगप्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेल्या श्री शारंगधर बालाजी मंदिरात फळांची आकर्षक आरास करण्यात आली होती. प्रभू शारंगधराचे हे मनमोहक रूप डोळ्यात साठवण्यासाठी गुरूवारी भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती.

मेहकरच्या श्री शारंगधर बालाजीचे नाव आज जगभरात पोहोचलेले असून, दररोज भक्त दर्शनासाठी येत असतात. कोणत्याही मोठ्या सणाचे औचित्य साधून मंदिरात विशेष सजावट करण्याची परंपरा आहे. आज गुढीपाडव्यानिमित्त गाभाऱ्यात विविध प्रकारच्या फळांची कलात्मक आरास करण्यात आली होती. तसेच, पुजारी मंडळींनी श्री शारंगधर बालाजीला अत्यंत आकर्षक आणि भरजरी पोषाख परिधान केला होता. फळांची सजावट आणि देवाचा तेजस्वी अवतार यामुळे मंदिराचा परिसर चैतन्यमयी झाला होता. हिंदू नववर्षाच्या पहिल्या दिवशी देवाचे दर्शन घेण्यासाठी भक्त मंडळी सकाळपासून रात्रीपर्यंत येत होती.मंदिराच्या गाभाऱ्यात केलेली फळांची आरास भाविकांच्या आकर्षणाचे मुख्य केंद्र ठरली. "शारंगधर बालाजीच्या दर्शनाने मनाला शांती मिळते आणि आजची ही सजावट पाहून डोळ्यांचे पारणे फिटले," अशी भावना अनेक दर्शनार्थींनी व्यक्त केली. मंदिर प्रशासनाकडून आणि पुजारी मंडळींकडून गुढीपाडव्याचे छान नियोजन करण्यात आले होते.



### ना.प्रतापराव जाधव यांची ना.गडकरी यांच्याकडे मागणी

## 'जिल्ह्यात रस्ते निर्मितीसाठी निधी द्या'

**बुलढाणा/प्रतिनिधी**

जिल्ह्यात सीआरएफ अंतर्गत रस्ते मार्ग निर्माण करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली आहे.

रस्ते हे देशाच्या प्रगतीचे मुख्य महामार्ग असून ते आर्थिक विकास, दळणवळण आणि सामाजिक एकत्रीकरणाचा कणा आहे.आधुनिक व सुसज्ज रस्ते कृषी, उद्योग आणि व्यापाराला गती देऊन ग्रामीण भागाला शहरांशी जोडून रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचं काम करतात केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांच्या



मंत्रालयाच्यावतीने बुलढाणा लोकसभा मतदारसंघात केंद्र सरकारच्या वतीने महामार्गांची निर्मिती झाली परंतु अजूनही काही महामार्गांची निर्मिती सीआरएफ अंतर्गत झाल्यास जिल्ह्यात दळणवळणाची सुविधा निर्माण होईल . या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या महामार्गांना निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केली.

जिल्ह्यातील नांदुरा येथील रेल्वे क्रॉसिंगवर ब्रिज नसल्याने या रस्त्यावरून जळगाव जामोद संग्रामपूर या आदिवासीक्षेत्र भागाकडे जाणाऱ्या वाहतुकीला नांदुरा येथे रेल्वे क्रॉस होईपर्यंत थांबावे लागते या क्रॉसिंगवर ब्रिज किंवा अंडरपास निर्माण व्हावा, अशी नागरिकांची इच्छा आहे. जनभावनेचा विचार करता या कामाला गती द्यावी अशी मागणी ही केंद्रीय आयुष्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी या भेटीदरम्यान गडकरी यांच्याकडे केली आहे. जिल्ह्यातील विकासात्मक रस्ते मार्गासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी दिले आहे .

## ५ एप्रिलला मिशन लक्ष्यवेधची खेळाडू निवड चाचणी

**बुलढाणा (जिमाका)**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मिशन लक्ष्यवेध योजना अंतर्गत जिल्हास्तर क्रीडा निपुणता केंद्रासाठी खेळाडू निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही चाचणी दि. 5 एप्रिल 2026 रोजी जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा येथे होणार आहे.

या योजनेअंतर्गत बुलढाणा येथे वेटलिफ्टिंग व मैदानी या क्रीडा प्रकारांसाठी निवासी स्वरूपाचे क्रीडा निपुणता केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. निवड झालेल्या खेळाडूंना दर्जेदार प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, अल्पोहार तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून दिले जाणार आहे. जिल्ह्यातील पात्र व गुणवंत खेळाडूंना प्रगत प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. इच्छुक खेळाडूंनी दि. 1 एप्रिल 2026 सायंकाळी 6 वाजेपर्यंत निर्धारित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा.



खेडाळू हा 31 डिसेंबरपर्यंत 21 वर्षांखालील मुलगे/मुली, महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असणे आवश्यक, राज्यस्तरीय पदक विजेते किंवा राष्ट्रीय स्तरावर सहभागी (SGFI, WFI, Khelo India) खेळाडू गत 2 वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक व शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य राहिल. इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रासह अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, जांभरून रोड, बुलढाणा 443001 येथे सादर करावा. तसेच अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. निवड प्रक्रिया शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार तज्ज्ञ समितीद्वारे करण्यात येणार आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाव्दारे जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी दिली.

**आवश्यक कागदपत्रे**

जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, क्रीडा कामगिरी प्रमाणपत्र, 3 फोटो, बोनाफाईड प्रमाणपत्र, पालक संमतीपत्र इत्यादी.

## Short न्यूज

### बँड कारागिरांच्या समस्यांबाबत चर्चा

**मलकापूर :** शिवसेना शिव लहू सेना जिल्हाध्यक्ष निवृत्ती तांबे यांनी चिखली येथील रेणुका मातेचे दर्शन घेतले. मंदिर प्रशासनासोबत बँड मालक व कारागीर यांच्या समस्यांबाबत चर्चा केली.लाखो भाविकांचे श्रद्धास्थान रेणुका मातेचे दर्शन घेऊन मन प्रसन्न झाल्याचे त्यांनी सांगितले. मंदिराचे विश्वस्त गोपाल शेटे व सचिन बोंद्रे यांची बँड मालक व कारागीर यांच्या शिष्टमंडळासह भेट घेतली. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. यंदाही २ एप्रिल रोजी आयोजित रेणुका माता महायात्रा दरम्यान चिखली सह परिसरातील मातंग समाजातील बँड पथक पारंपारिक पद्धतीने बँड कला सादर करण्यासाठी सहभागी होणार आहे. या बँड पथकाचे वाजंत्री गटाच्या समस्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. याप्रसंगी दादाराव महाले, सुभाष निकाळजे, गजानन गायकवाड, सचिन कांबळे, प्रविण कांबळे, दिनेश पारेकर यांच्यासह बँड पथक मालक व कारागीर उपस्थित होते.

### अल्पवयीन मुलीस पळविले

**छत्रपती संभाजीनगर :** सातारा तांडा परिसरात अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणात पोलिसांनी एका संशयीत आरोपीविरुद्ध सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. अजय गुलाब पवार (३१) रा. श्रेयस कॉलेज जवळ, सातारा तांडा असे संशयीताचे नाव आहे. पीडित मुलीच्या आईने फिर्याद दिली. त्यानुसार, १८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास सातारा तांडा क्र. १ येथील रंजित पवार यांच्या शेताच्या रस्त्यावरून ही घटना घडली. फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीला आरोपी अजय पवार याने फूस लावून पळवून नेल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी अजय पवारविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक देशमुख करीत आहेत.

### अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप

**नांदुरा :** तालुक्यातील अवधा बु. येथे हनुमान मंदिरात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा १२ मार्च रोजी सुरू झाला असून या सप्ताहात प्रमुख कथावाचक म्हणून हभप आचार्य योगेश महाराज किन्होळकर यांचे सुमधुर वाणीतून कथा वाचन होत आहे. या सप्ताहामध्ये दररोज सकाळी काकडा आरती, भागवत कथा वाचन तसेच सायंकाळी हरिपाठ आणि रात्री हरिकीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.यामुळे अवधा गावात भक्तीमय वातावरण झाले आहे. सर्व गावकरी एकजुटीने सहकार्य करीत आहेत. सप्ताहाचा १९ मार्च रोजी सकाळी १० वाजता हभप आचार्य योगेश महाराज किन्होळकर यांचे काल्याचे कीर्तन होऊन सप्ताहाचा समारोप झाला. दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील भाविकांनी महाप्रसाद व कथा वाचनाचा लाभ घेतला.

### चोरट्यासह साहित्य घेणाऱ्याविरुध्दही गुन्हा




**खामगाव :** घरातून ४७ हजार रुपये किंमतीचे इलेक्ट्रीक साहित्य लंपास करणाऱ्या चोरट्यासह साहित्य घेणाऱ्याविरुध्दही शिवाजी नगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई १८ मार्च रोजी करण्यात आली. सजनपुरी येथील मंगेश भगतपुरे यांनी आपल्या घरात इलेक्ट्रीक साहित्य ठेवले होते. गावातीलच आरोपी भिका लक्ष्मण भगतपुरे याने २६ फेब्रुवारी रोजी घरात प्रवेश केला. घरातील वायरचे बंडल, स्विच, अम्पीयर, सॉकेट, रेगुलेटर, एमएमचे दोन नग, राऊंड प्लेट, मॉड्युलर कव्हर असा एकूण ४७ हजार ३३०रुपयांचा ऐवज चोरुन नेला. सर्व ऐवज खामगाव ओंकारेश्वर स्मशानभूमी जवळील भंगार साहित्य खरेदी करणारा व्यावसायिक अप्पू पठान याला विकला. याबाबत चौकशीअंती हे सर्व सिध्द झले. त्यामुळे आरोपी भिका भगतपुरे व अप्पू पठान या दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास शिवाजी नगरचे ठाणेदार सुरेंद्र अहिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

---

### पिसादेवी येथील जाहीर सभेतून केले आवाहन..

# औरंगजेबाची कबर उखडून फेका अन् तिथे मूत्रालय बांधा : टी. राजासिंह

■ छत्रपती संभाजीनगर/वृत्तसंस्था



"औरंगजेबाची कबर म्हणजे हिंदूंच्या छातीवर ठोकलेला खिळा आहे. जोपर्यंत ही कबर उखडून फेकली जात नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी, इतिहास लिहिण्याची हीच वेळ आहे. जेसीबी लावा आणि ती कबर उखडून तिथे मूत्रालय बांधा," अशा अत्यंत आक्रमक शब्दांत श्रीराम युवा सेनेचे संस्थापक अध्यक्ष आणि प्रखर हिंदुत्ववादी नेते टी. राजासिंह ठाकूर यांनी रणशिंग फुंकले.

पिसादेवी येथील द्रौपदाबाई नानाभाऊ काळे क्रीडा संकुलात आज १९ मार्च रोजी पार पडलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर धर्मप्रचारक सदगुरू नंदकुमार जाधव आणि हिंदू जनजागृती समितीच्या प्रियांका लोणे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना टी. राजासिंह यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख 'देवाभाऊ' असा करत " देवाभाऊ तुम्ही ही कबर उखडून टाका, महाराष्ट्रातील प्रत्येक हिंदू तुम्हाला मरेपर्यंत विजयी करेल,असे आव्हान केले. आमच्या छत्रपती संभाजी महाराजांचे हाल केले, त्याची कबर महाराष्ट्राच्या पवित्र भूमीत असूच शकत नाही. तुमची मुलगी कोणत्याही वयाची असो, तिला शत्रू आणि मित्र यातला फरक सांगा, असे आवाहनही त्यांनी यावेळी महिलांना केले. लव्ह जिहादसाठी परदेशातून फंडिंग होत असल्याचा खळबळजनक आरोप करत त्यांनी सर्वांना 'केरळ स्टोरी २' पाहण्याचा सल्ला दिला.

**धर्मांतर विरोधी कायद्याचे स्वागत पण...**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आणलेल्या 'महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयका'चे त्यांनी स्वागत केले. मात्र, केवळ कायदा करून चालणार नाही, तर त्याच्या अंमलबजावणीसाठी विशेष 'टास्क फोर्स' नेमावा आणि ज्या जिल्ह्यात धर्मांतर होईल, तिथल्या जिल्हाधिकाऱ्याला थेट निलंबित करावे, अशी आक्रमक मागणीही त्यांनी लावून धरली. यावेळी "जब जब हिंदू बटा है, तब तब हिंदू कटा है!", या घोषणेने संपूर्ण क्रीडा संकुल दणाणून गेले होते.

**इम्तियाज जलील यांच्यावर टीका**

एमआयएम नेते इम्तियाज जलील यांच्यावर तोफ डागत राजासिंह म्हणाले की, "हिंदूंच्या विभाजनामुळेच जलील यांच्यासारख्यांची 'बदला घेण्याची' हिंमत वाढली आहे. आपण जातीपातीत विखुरलो गेलो म्हणूनच मालेगाव आणि संभाजीनगरमध्ये ओवेसींचा पक्ष फोफावला." देशात तातडीने 'लोकसंख्या नियंत्रण कायदा' लागू करण्याची गरज असून सदर कायदा मोदींनी लागू करण्याची मागणी त्यांनी केली. "आमचे दोन तर त्यांचेही दोनच असावेत. दोनपेक्षा जास्त मुले असल्यास त्यांना सरकारी योजनांपासून वंचित ठेवा आणि १ लाख रुपये दंड लावा," असे ते म्हणाले.

---

## विवाहीतेचा विनयभंग करून लग्नासाठी तगादा; गुन्हा दाखल

■ मलकापूर/प्रतिनिधी

पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या शेगाव शहरात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरातील लाल बाबा देवी मंदिर परिसरात एका २३ वर्षीय विवाहितेचा विनयभंग करून, तिला मिठीत ओढत लग्नासाठी दबाव टाकणाऱ्या एका माथेफिरू विरोधात शेगाव शहर पोलीस स्टेशनमध्ये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोपीच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे.

कालवड, ह.मु. अकोट रोड (शेगाव) येथील रहिवासी असलेल्या २३ वर्षीय पीडितेची दीड वर्षांपूर्वी आरोपी विशाल (रा.सावळी, ता. संग्रामपूर) याच्याशी ओळख झाली होती. या ओळखीचा गैरफायदा घेत आरोपीने पीडितेचा मोबाईल क्रमांक मिळवला आणि तो त्यांच्याशी सतत संपर्क साधू लागला. यादरम्यान त्याने काही फोटोही आपल्या मोबाईलमध्ये काढले होते. मात्र, विशाल हा दारूच्या आहारी गेल्याचे समजताच पीडितेने त्याच्याशी असलेले सर्व संबंध तोडून टाकले होते.

पीडिता मागील दोन महिन्यांपासून आपल्या आईसह अकोट रोड परिसरात भाड्याने राहत आहेत. १७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास त्या अकोट रोडवरील लाल बाबा देवी मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत माथेफिरू विशाल तिथे पोहोचला. "तू माझ्याशी का बोलत नाहीस?" असा जाब विचारत भररस्त्यात पीडितेला अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

इतक्यावरच न थांबता, वाईट उद्देशाने पीडितेचा उजवा हात धरून त्यांना जबरदस्तीने मिठीत ओढले. या अचानक झालेल्या प्रकारामुळे पीडितेने आरडाओरडा केला असता, घाबरलेल्या आरोपीने त्यांना सोडले. "तू माझ्याशी फोनवर का बोलत नाहीस? माझ्याशी लग्न कर, मी तुझे लग्न दुसऱ्या कोणाशीही होऊ देणार नाही.", अशी धमकी दिली. आरोपी विशाल हा मागील काही दिवसांपासून पीडितेचा सतत पाठलाग करून त्यांना मानसिक त्रास देत होता. या सततच्या छळामुळे आणि धमक्यांमुळे आपल्या जीवाला धोका निर्माण झाल्याने पीडितेने शेगाव शहर पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी उपरोक्त आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५, ७८ आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अंमलदार रामदास घटे हे करत आहेत.

---

## चाकणकर यांच्या राजीनाम्यासाठी उपोषणाचे हत्यार

■ मुंबई/वृत्तसंस्था

### 'त्या' वादग्रस्त कृतीवरून संतापल्या करूणा मुंडे



महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या कामकाजावर आणि त्यांच्या काही वादग्रस्त कृतींवरून सध्या राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. "महिलांना न्याय देण्याऐवजी आरोपींची सेवा करण्यातच अध्यक्षांना रस आहे का?" असा संतप्त सवाल विचारत, आता त्यांच्या राजीनाम्यासाठी मंत्रालयासमोर आमरण उपोषणाचा पवित्रा घेणार आहे. जोपर्यंत चाकणकर आपल्या पदाचा राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन मागे घेतले जाणार नाही, असा इशारा स्वराज्य शक्ती सेनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा करुणा धनंजय मुंडे यांनी दिला आहे.

मुंबईस्थित शांताकृज येथील करुणा मुंडे यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या पत्रकार परिषदेत बोलतांना त्यांनी उपरोक्त इशारा दिला. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, महिला आयोगाच्या अध्यक्षांचे प्राथमिक कर्तव्य हे राज्यातील पीडित महिलांना आधार देणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे हे असते. मात्र, रूपाली चाकणकर यांच्या बाबतीत धक्कादायक चित्र समोर आले आहे. बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी अशोक खरात यांच्यावर छत्री धरून त्यांना सावली देणे, ही कृती एका महिला आयोग अध्यक्षाला शोभते का? असा सवाल जनतेतून विचारला जात आहे. ज्या व्यक्तीवर गंभीर आरोप आहेत, त्यांच्या पादुकांचे पूजन करतानाचे फोटो समोर आहेत. ही कसली निष्ठा आणि कसली संस्कृती? असा प्रश्न उपस्थित करत महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न प्रलंबित असताना, केवळ रांगोळ्या काढणे आणि प्रसिद्धीच्या झोतात राहणे हेच महिला आयोगाचे काम उरले आहे का? अशी टीका देखील त्यांनी केली.

**कार्यकाळ संपला तरी खुर्चीला चिकटून?**

करुणा मुंडे यांनी सर्वात मोठा आक्षेप हा चाकणकर यांच्या पदोपभोगावर घेतला. रूपाली चाकणकर यांचा महिला आयोग अध्यक्षपदाचा कायदेशीर कार्यकाळ संपलेला आहे. नियमानुसार, कार्यकाळ संपल्यानंतर त्या पदावर राहण्याचा त्यांना कोणताही नैतिक किंवा कायदेशीर अधिकार उरत नाही. तरीही त्या पदाचा गैरवापर करत आहेत. राज्यातील महिलांच्या प्रश्नांकडे होणारे दुर्लक्ष आणि अध्यक्षांची संशयास्पद कार्यपद्धती यांविरुद्ध आता थेट मंत्रालयासमोर उपोषण करणार असून रूपाली चाकणकर यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा. वादग्रस्त व्यक्तींना पाठीशी घातल्याप्रकरणी त्यांची चौकशी व्हावी. जोपर्यंत राजीनामा मिळत नाही, तोपर्यंत पाण्याचा थेंबही न घेता उपोषण सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

---

## प्रशासनाचा हलगर्जीपणा: मोहना खुर्द येथे 'पाणी उशाला, कोरड घशाला'; हातपंप दुरुस्तीची ग्रामस्थांची मागणी

■ मेहकर/प्रतिनिधी



मेहकर तालुक्यातील मोहना खुर्द ग्रामपंचायत प्रशासनाच्या कमालीच्या दुर्लक्षामुळे गावातील अनेक हातपंप मागील अनेक महिन्यांपासून नादुरुस्त अवस्थेत पडून आहेत. गावात पाणी असूनही ते मिळत नसल्याने सध्या ग्रामस्थांवर "पाणी उशाला आणि कोरड घशाला" अशी म्हणण्याची वेळ आली आहे. शासनाच्या वतीने गावकऱ्यांची तहान भागवण्यासाठी ठिकठिकाणी हातपंप बसवण्यात आले होते. एकेकाळी संपूर्ण गावाची तहान याच हातपंपांवर भागत असे. मात्र, गावात नवीन नळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाल्यापासून जुन्या हातपंपांकडे प्रशासनाने पूर्णपणे पाठ फिरवली आहे. देखभाल अभावी हे हातपंप आता अडगळीत पडले आहेत. भारनियमनाचा बसतोय फटका

सध्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर भारनियमन सुरू आहे. जेव्हा वीज नसते, तेव्हा नळांना पाणी येत नाही. अशा वेळी गावातील नागरिकांना हातपंपांचाच एकमेव आधार असतो. मात्र, ऐन गरजेच्या वेळी हातपंप बंद असल्याने महिलांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.ग्रामपंचायत प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन गावातील नादुरुस्त हातपंप तात्काळ दुरुस्त करावेत, अशी आग्रही मागणी मोहना खुर्द येथील ग्रामस्थांनी केली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

---

## अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याभोवती बसवली जाळी

■ खामगाव/प्रतिनिधी



शहरातील रेल्वे स्थानकाजवळ विना परवानगी उभारण्यात आलेल्या पुतळ्याच्या प्रकरणात तणाव कायम असून 18 मार्च रोजी रात्री संबंधित समाजबांधवांनी पुतळ्याभोवती संरक्षक जाळी बसवली. १७ मार्च रोजी पुतळा उभारल्यानंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

प्रशासनाने हा प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न केले. त्यातून तोडगा न निघाल्याने समाजबांधवांनी बसस्थानक चौकात आंदोलनही केले होते. दरम्यान पुतळा काही काळ झाकून ठेवण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा उघडण्यात आला. या प्रकरणी १८ मार्च रोजी उशीरा रात्री पोलिसांनी कारवाई करत सुमारे ३० ते ३५ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. तरीही 18 मार्च रोजी रात्री समाजबांधवांनी एकत्र येत पुतळ्याचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने जाळी बसवण्याचा निर्णय कायम ठेवला. घटनेच्या पार्श्वभूमीवर नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत शेळके व अतिक्रमण निर्मूलन पथक प्रमुख अहीर यांनी उपस्थित राहून नागरिकांना शांतता राखण्याचे व कायदा हातात न घेण्याचे आवाहन केले. मात्र प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करण्यात आले. या संपूर्ण प्रकारामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पोलिस प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

---

### आपत्ती व्यवस्थापन जनजागृती प्रशिक्षण

**खामगाव :** राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तसेच तहसील कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने १८ मार्च रोजी महात्मा गांधी सभागृह येथे आपत्ती विषयक जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणामध्ये भूकंप, पूर तसेच इतर नैसर्गिक आपत्तींच्यावेळी प्रभावी मदतकार्य कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी, आशा सेविका, महसूल कर्मचारी व आपदामित्र यांना प्रशिक्षण देण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत जीव वाचविण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सीपीआर आणि प्राथमिक उपचार यांचे प्रात्यक्षिक सादरीकरण करण्यात आले. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष सरावाची संधी मिळाल्याने आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता आणि आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले. या कार्यक्रमाला सुनिल पाटील, निखिल पाटील, जालिंदर फुंदे, एस. जी. भंडारे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

## नागरिकांना सिलेंडर मिळेना; हॉटेल व्यवसाय आले अर्ध्यावर

### आखाती युद्धाचा परिणाम; गॅस पुरवठा सुरळीत होण्याची अपेक्षा

■ बुलढाणा/प्रतिनिधी



आखाती युद्धामुळे सिलेंडर मिळत नसल्याने बुलढाण्यातील हॉटेल व्यवसाय अडचणीत आला आहे. मोठ्या हॉटेलमध्ये महिन्याला जवळपास २५ ते ३० सिलेंडर लागतात; मात्र युद्धजन्य परिस्थितीमुळे सिलेंडर उपलब्ध होत नाहीत. याचा थेट परिणाम गल्ल्यावर झाला असून गिऱ्हाईकी अर्ध्यावर आल्याचे व्यावसायिकांकडून सांगण्यात येत आहे.

बुलढाणा हे नोकरदारांचे शहर म्हणून ओळखले जाते. पगारदार कर्मचारी जास्त संख्येने राहत असल्याने येथे हॉटेलिंगचा व्यवसाय चांगला बहरला. खिसा गरम असला की, माणूस खर्च करायला मागे पुढे पाहत नाही. नोकरदार मंडळी नाही म्हटलं तरी आठवड्यातून एकदा तरी कुटुंबासह बाहेर जेवायला जातात. हॉटेल व्यवसायिकांना याचा लाभ होतो. तसेच बुलढाणा शहर जिल्हा मुख्यालय असल्याने येथे सर्वच शासकीय कार्यालये आहेत. या कार्यालयाच्या बैठका, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, प्रशिक्षण अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. सहाजिकच हॉटेल व्यवसायाला पूरक वातावरण असून हॉटेलिंगचे मोठे जाळे विणले गेले आहे. अमेरिका, इस्त्राईल, इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धामुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला. गॅस वितरकांनी व्यावसायिक सिलेंडर देणे बंद केले. त्यामुळे हॉटेल कसे चालवावे? असा प्रश्न मालकांसमोर उभा ठाकला आहे. आखाती युद्धामुळे व्यावसायिक सिलेंडरच्या किंमतीमध्येही वाढ झाली आहे. ७ मार्चपासून व्यावसायिक १९ किलो गॅस सिलेंडरच्या दरात वाढ करण्यात आली आहे. १९ किलोचा व्यावसायिक सिलेंडर प्रति सिलेंडर ११५ रुपयांनी महागला आहे. त्यामुळे हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सच्या खर्चात वाढ झाली आहे. परिणामी काही पदार्थांच्या किंमती वाढल्या आहेत.

**कोळसा भट्टीचा वापर**

व्यावसायिक सिलेंडर मिळत नाही म्हणून व्यवसाय बंद ठेवता येऊ शकत नाही. जेंव्हा गॅस नव्हता तेंव्हा हॉटेल्स चालतच होत्या. त्यामुळे आलेल्या परिस्थितीचा सामना करीत त्यावर मार्ग काढण्याची भूमिका व्यावसायिकांनी घेतली आहे. गॅसला पर्याय म्हणून कोळसा भट्टीचा वापर करणार असल्याचे हॉटेल्स व्यावसायिकांनी सांगितले. गॅसच्या तुलनेत कोळसा भट्टीवरील कामे संथगतीने होतील, परंतु त्याला पर्याय नाही. ग्राहकांना माघारी जावे लागू नये याबाबत खबरदारी घेण्यात असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले.

---

## सायबर भामट्यांचा हैदोस; पाच कोटींचा 'डिजिटल दरोडा'

■ मुंबई/वृत्तसंस्था




देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत आता चोरटे गल्लीबोळात नाही, तर तुमच्या मोबाईलच्या स्क्रीनवर दबा धरून बसले आहेत. गेल्या २४ तासांत मुंबई सायबर सेलने प्रसिद्ध केलेला आकडा पाहून कोणाचेही डोळे पांढरे पडतील. केवळ एका दिवसात 'शेअर मार्केट टिप्स' आणि 'गुंतवणुकीवर भरघोस परतावा' देण्याच्या नावाखाली मुंबईकरांना तब्बल ५ कोटी रुपयांचा चुना लावण्यात आला आहे. हा आकडा केवळ नोंद झालेल्या गुन्ह्यांचा आहे; प्रत्यक्षात कितीतरी पटीने अधिक लूट झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पूर्वी दरोडेखोर शस्त्रांचा धाक दाखवून लुटायचे, पण आजचे हे 'पांढरपेशी' सायबर गुन्हेगार केवळ एका व्हॉट्सअ‍ॅप मेसेज किंवा टेलिग्राम लिंकच्या साहाय्याने तुमची आयुष्यभराची पुंजी लंपास करत आहेत. मुंबई सायबर सेलच्या अहवालानुसार, गेल्या काही तासांत शेकडो मुंबईकरांनी आपली फसवणूक झाल्याची तक्रार नोंदवली आहे. शेअर बाजारात पैसा दुप्पट करण्याचे आमिष दाखवून सुशिक्षित आणि नोकरदार वर्गाला जाळ्यात ओढले जात आहे.

या गुन्हेगारांची कार्यपद्धती अत्यंत नियोजनबद्ध असते. सुरुवातीला तुम्हाला फेसबुक किंवा इंस्टाग्रामवर शेअर बाजार तज्ज्ञांच्या नावाने जाहिराती दिसतात. एकदा तुम्ही त्या लिंकवर क्लिक केले की, तुम्हाला एका व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपमध्ये सामील केले जाते. तिथे काही बनावट 'इन्व्हेस्टर्स' आपल्याला किती मोठा नफा झाला, याचे स्क्रीनशॉट्स शेअर करून तुमचा विश्वास संपादन करतात.

त्यानंतर, तुम्हाला एक बनावट ट्रेडिंग अ‍ॅप डाऊनलोड करायला लावले जाते. या अ‍ॅपमध्ये तुमचे पैसे वाढत असल्याचे 'व्हर्च्युअली' दिसते, पण जेव्हा तुम्ही ते पैसे काढण्याचा प्रयत्न करता, तेव्हा 'टॅक्स' किंवा 'प्रोसेसिंग फी'च्या नावाखाली तुमच्याकडून अजून पैसे उकळले जातात. शेवटी, तुमचे खाते ब्लॉक केले जाते आणि ते भामटे गायब होतात.

मुंबई सायबर सेलने स्पष्ट केले आहे की, गेल्या २४ तासांत झालेल्या ५ कोटींच्या फसवणुकीत सर्वाधिक बळी हे ५० ते ६० वयोगटातील निवृत्त व्यक्ती आणि आयटी क्षेत्रातील तरुण आहेत. "लोभीपणा आणि घाईत श्रीमंत होण्याची ओढ सायबर गुन्हेगारांच्या पथ्यावर पडत आहे," असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

**तुमची सुरक्षा तुमच्या हातात!**

■ जर तुम्हालाही "घरबसल्या कमवा", "शेअर मार्केटमध्ये ५००% परतावा" किंवा "विनामूल्य ट्रेडिंग टिप्स" असे मेसेज येत असतील, तर सावध व्हा. कोणताही अधिकृत ब्रोकर किंवा तज्ज्ञ व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर वैयक्तिक खात्यात पैसे भरण्यास सांगत नाही. जर तुमची किंवा तुमच्या ओळखीच्या कोणाची फसवणूक झाली असेल, तर वेळ न घालवता तातडीने १९३० या राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाईन नंबरवर कॉल करा किंवा WWW.CYBERCRIME.GOV.IN या पोर्टलवर तक्रार नोंदवा. लक्षात ठेवा, पहिल्या २ तासांत तक्रार केल्यास तुमचे पैसे परत मिळण्याची शक्यता जास्त असते.

---

## नांदुऱ्यातून २२ वर्षीय तरुणी बेपत्ता; दुर्गा नगर परिसरातील घटना

■ मलकापूर/प्रतिनिधी


नांदुरा येथील दुर्गा नगर भागातील रहिवासी असलेल्या एका २२ वर्षीय तरुणी गूढरीत्या बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. १८ मार्च २०२६ रोजी दुपारच्या सुमारास ही घटना घडली असून, याप्रकरणी नांदुरा पोलीस स्टेशनमध्ये 'मिसिंग'ची नोंद करण्यात आली आहे.

नांदुरा शहरातील दुर्गा नगर, वार्ड नंबर दोनमध्ये राहणारे नंदकिशोर रामराव देशमुख (वय ४५ वर्षे) हे नगरपालिकेत नोकरीला आहेत. त्यांची २२ वर्षांची मुलगी चंचल नंदकिशोर देशमुख, ही १८ मार्च २०२६ रोजी दुपारी १२.५५ वाजेच्या सुमारास कोणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेली. बराच वेळ झाला तरी ती घरी न परतल्याने कुटुंबीयांनी तिची शोधाशोध सुरू केली. नातेवाईक, मित्रमैत्रिणी आणि गावातील इतर संभाव्य ठिकाणी शोध घेऊनही चंचलचा कुठेही पत्ता लागला नाही. या प्रकरणी नंदकिशोर देशमुख यांनी नांदुरा पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी मिसिंग दाखल केली आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस अंमलदार मोहिद्दीन सय्यद हे करत आहेत. चंचल नंदकिशोर देशमुख हिची उंची ५ फूट ३ इंच, रंग गोरा, चेहरा गोल, केस काळे आणि लांब, डोळे काळे, नाक सरळ, बांधा मध्यम असून तिने अंगात फिक्कट जांभळ्या रंगाचे टी-शर्ट आणि ग्रे रंगाची नाईट पॅन्ट घातलेली आहे. उपरोक्त वर्णनाची तरुणी कोठे दिसून आल्यास किंवा तिच्याबाबत काही माहिती मिळाल्यास तात्काळ नांदुरा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# भक्तिमार्ग

विशेष लेख

## शिकवण गुळवणी महाराजांची



**महाराष्ट्राला संतांची मोठी परंपरा लाभली आहे. संतांनी वर्षानुवर्षे साधना केली, तपश्चर्या केली आणि त्यानंतर मिळालेलं ज्ञानामृत साधकांमध्ये वाटलं. म्हणूनच संतसाहित्याचा अभ्यास आपल्याला समृद्ध आणि शहाणं करतोच शिवाय ऐहिक सुखांच्या जंजाळातून बाहेर पडण्याची प्रेरणाही देतो. प. पू. गुळवणी महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने माझ्या या श्रेष्ठ गुरूंच्या जीवनचरित्राचा संक्षिप्त आढावा...**

आपल्याकडे संतांची मोठी परंपरा पहायला मिळते. संतांची शिकवण माणसाला जीवनध्येय सांगते. ऐहिक सुखांच्या जंजाळात न अडकता परमार्थ साधण्याचे धडे देणारे संत वाटाड्या म्हणून आपली साथ करत राह- तात. त्यांचं मार्गदर्शन आपल्याला चुकीच्या वाटेवरुन जाण्यापासून रोखतंच शिवाय योग्य मार्गावर वाटचाल करण्याची सूचनाही देतं. त्यांचं जीवनचरित्र इतकं उत्कट आणि चमत्कृतीपूर्ण असतं त्याचं वाचन अथवा स्मरण आपल्याला नवप्रेरणा देऊन जातं. अशाच थोर संतांपैकी परमपूज्य वामन दत्तात्रय गुळवणी (गुळवणी महाराज) यांच्या जीवनप्रवास आणि चरित्राचा अभ्यास केला असता शाश्वत आनंद आणि समाधान मिळेल यात शंका नाही. वैदिक परंपरा असणाऱ्या श्रद्धावान, तात्विक, धार्मिक आ- चार पाळणाऱ्या त्याचप्रमाणे दत्ताच्या पादुका मि ळवण्यासाठी ध्यास घेणाऱ्या, उपोषण करणाऱ्या आणि याचं फळ म्हणून प्रत्यक्ष दत्ताच्या पादुका प्रसाद म्हणून मिळाल्या त्या दत्तंभट आणि उमाबाईंच्या पोटी श्रीपाद श्रीवल्लभांच्या इच्छेने वामनचा जन्म झाला. ज्ञान, भक्ती, वैराग्य या योग्याच्या अंगी असणाऱ्या सर्व गुणांसह वामन लहानाचा मोठा होत गेला. १३० वर्षांपूर्वीपासूनची वैदिक परंपरा असणाऱ्या घराण्यात जन्म होऊनही परंपरेने येणारं वैदिकीचं शिक्षण न देता लहानग्या वामनला शाळेत घालण्यात आलं. चित्रकला विषयातील आवड पाहून पुढील अभ्यासाला प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने जे.जे. स्कूल ऑफ आर्टसमध्ये मिळालेल्या प्रवेशाचा त्यांना चांगला उपयोग झाला. इथे त्यांचं चित्रकलेचं शिक्षण पूर्ण झालं. एकीकडे हे सुरू असतानाच वैदिकीचं शिक्षण घेऊन परंपरेने आलेली वैदिकी करणाऱ्या पण पारमार्थिक मार्गाची आवड असणाऱ्या थोरल्या बंधूंनी (शंकरशास्त्रींनी) वामनला या मार्गाची ओळख करुन दिली. मुळातच ज्ञान, योग आणि वैराग्य घेऊन जन्माला आलेल्या वामनने ब्रह्मचारी राहण्याचा निर्धार केला होता. पण ब्रह्मचारी राहूनही त्यांनी सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडल्या. शैक्षणिक क्षेत्रात त्याचप्रमाणे चित्रकला, हस्तकला, शिल्पकला, छायाचित्रण, क्रेपची फुलं करणं यात त्यांनी उच्च दर्जाचं प्राविण्य मिळवलं. त्यांनी काढलेली चित्रं अतिशय सुंदर असायची. त्यांनी बनवलेली क्रेपची फुलं तर खऱ्या फुलांपेक्षा सुंदर आणि मोहीत करणारी असायची. या दर्जेदार कलाविष्कारामुळेच वामनरावांची कला थेट साता समुद्रापलिकडे पो- होचली आणि त्याबद्दल त्यांना मानपत्र आणि सुवर्णपदक मिळालं.

पारमार्थिक वाटचालीमध्ये त्यांना प. पू. श्री टेंबेस्वामी महाराज गुरू म्हणून लाभणं ही खूप मोठी गोष्ट म्हणायला हवी. मुळातच वैराग्य, नम्रपणा अंगी बाणवलेलं असल्यामुळे तसंच योगाभ्यास आणि गुरूंवरील श्रद्धा या स्वभाववैशिष्ट्यांमुळे वामन टेंबेस्वामीमहाराजांचा लाडका शिष्य झाला. हवनूर, पवनी आणि गरुडेश्वर येथे वेळो- वेळी गुरूंचं लाभलेलं मार्गदर्शन, त्यांच्याकडून मिळालेले धडे यामुळे वामनरावांचा पारमार्थिक पाया पक्का झाला. प. पू. टेंबेस्वामींनी देह ठेवल्यानंतर शक्तिपात म्हणजे काय, कुंडलिनी जागृती म्हणजे काय याविषयी कोण सांगेल याची वामनरावांना तळमळ लागून राहिली आणि हुशंगाबादला नर्मदेच्या तिरी शक्तिपाताची दीक्षा देणारे प. पू. श्री. लोकनाथतीर्थ स्वामी महाराज यांची त्यांनी भेट घेतली. वामनरावांची योगाभ्यासातील प्रगती पाहून स्वामी महाराजांनी त्यांना शक्तिपाताची दीक्षा दिली आणि कुंडलिनी जागृतीचा अनुभव दिला. प्रगती आणि अधिकार लक्षात आल्यावर प. पू. लोकनाथतीर्थ स्वामीम हाराजांनी वामनरावांना दीक्षाधिकारही दिला आणि सद्गुरूपदावर नेऊन ठेवलं. २७ जानेवारी १९६५ या दिवशी भक्तांच्या आग्रहावरुन त्यांनी पुणे इथे वासुदेव निवास या नावाने आश्रम उभा केला आणि तिथे वास्तव्य केलं. पण सदर आश्रम विश्वस्तांच्या ताब्यात देण्याची त्यांची अलिप्त वृत्ती तेव्हाही बघायला मिळाली. त्यांनी साधकांना आपल्या दोन्ही गुरूंची ज्ञानभक्ती, परम उपासना, शिकवण आणि शक्तिपात दीक्षा देऊन, संप्रदायाचं पालन करत मुक्ती मिळवून देण्यास मोलाची मदत केली.

व्यवहारात राहूनही अलिप्तपणे कसं वागावं याची शिकवण योगीराज गुळ- वणी महाराजांच्या आचार-विचारात दिसते. नित्यनैमितिक, नेमधर्म कटाक्षाने पाळणं हा त्यांचा स्थायी भाव होता. शरीर आणि मन निरोगी राखण्यासाठी, शरीर शुद्ध राहण्यासाठी योगासनं करावीत आणि मन शुद्ध राखण्यासाठी नामस्मरण करावं असं ते आवर्जून सांगत असत. अहिंसा, सत्य आदी धार्मिक मूलतत्त्वाचा प्रचार करणं हेच खरं समाजकार्य असल्याचं ते मानत आणि त्याचाच उपदेश शिष्यांना करत. प. पू. गुळवणी महाराजांचं चरित्र म्हणजे ऐहिक आणि पारमार्थिक मार्गावर साफल्य मिळवून देण- ारा प्रवास आहे. कुटुंबातील संस्कार, तिथून मिळालेलं प्रोत्साहन आणि त्यावर स्वत: घेतलेल्या परिश्रमांचा परिणाम म्हणजे त्यांची जीवनयात्रा होय. स्वत:बरोबर इतरांचं जीवन सफल करण्याच्या वृत्तीमुळे, मी बी घडलो, तुम्हीही घडा ना, या उक्तीप्रमाणे ते आयुष्यभर वागत राहिले आणि त्याप्रमाणेच अनेकांना त्यांनी घडवलं. आपल्यासारखे करिती तात्काळ या दीक्षेचा परिणाम म्हणून त्यांनी जे जे इच्छुक होते त्यांना दिव्य स्पर्शाने पावन केलं. सर्वसमभावाची शिकवण देऊन त्यांनी साधकांच्या मनात अन्य धर्मांबद्दल आदर निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

## कोणाशी घालू नये वाद?



काही जण सतत कोणाशी ना कोणाशी वाद घालत असतात. काही लोक जाणतेपणी तर काही अजाणतेपणी वाद घालत बसतात. पण काही लोकांशी वाद घालणं योग्य नसल्याचं मनुस्मृतीत नमूद करण्यात आलं आहे. कोण आहेत हे लोक? पाहु या...

* यज्ञासाठी आलेला ब्राह्मण पूजनीय असतो. अशा ब्राह्मणाकडून एखादी चूक झाली तरी वाद घालू नये. यज्ञासाठी आलेल्या ब्राह्मणाशी वाद घातल्याने यजमानांची प्रतिष्ठा धुळीला मिळते.

* पौरोहित्य करण्यासाठी पुरोहिताची नेमणूक केली जाते. त्यांच्याशी वाद घालू नये. पौरोहित्य करणाऱ्यामुळे यजमानांना पुण्य मिळतं. त्यामुळे अशा व्यक्तीशी नाहक वाद घालणं योग्य ठरत नाही.

* पूर्वी आपल्याकडे मुंज झालेल्या मुलांना गुरूकुलात पाठवलं जात असे. इथे आचार्य त्यांना शिक्षण देत असत. आजच्या काळात शाळा आणि महाविद्यालयातले शिक्षक हेच आचार्य आहेत. शिक्षक विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी झटत असतात. त्यामुळे कधीही त्यांच्याशी वाद घालू नये.

* ङ्गअतिथी देवो भवङ्ग असं भारतीय संस्कृती सांगते. घरी आलेले पाहुणे देवासमान असतात. त्यामुळे त्यांचं योग्य आदरातिथ्य करायला हवं. त्यांच्याशी वाद घालू नये. भांडण करू नये.

* आईला ईश्वरस्वरूप मानण्यात आलं आहे. तीच आपल्या बाळाची पहिली गुरू असते. त्यामुळे आईशी वादविवाद करू नये. अनेक धर्मग्रंथांमध्ये आईची महती वर्णन करण्यात आली आहे.

* पिता आपल्या मुलांचं पालनपोषण करत असतो. पित्यालाही मातेप्रमाणे देवासमान मानलं जातं. त्यामुळे त्यांच्याशी भांडण करू नये.

* हिंदू धर्मात मोठ्या भावाला पित्याची उपमा देण्यात आली आहे. धाकटा भाऊ पुत्राप्रमाणे असतो. त्यामुळे या दोघांशीही वाद घालू नये. कठीण प्रसंगात भाऊच भावाच्या मदतीला येऊ शकतो.

धर्मशास्त्रातून...

* मामा, काका, काकू, आत्या यांचं आपल्यावर प्रेम असतं. बाल- पणापासून ते आपले लाड करतात. त्यामुळे जवळच्या नातेवाईकांशी वाद घालू नये.

* बहिणींशी वाद घालू नये. बहिणींमुळे घरात आनंद नांदत असतो. याच बहिणी भावाच्या पाठीशी उभ्या असतात. त्यामुळे त्यांच्याशी भांडू नये.


* मुलगा, मुलगी आणि पत्नी यांच्याशी वाद घालू नये. वार्ध्यक्यात मुलं आणि मुलीच आईवडिलांची जबाबदारी घेतात. मुलीला लक्ष्मीसमान मानलं जातं तर पत्नी अर्धांगिनी असते.

* नोकर, सून आणि जावई यांच्याशी वाद घालू नये. नोकराला घरातली गुपितं माहीत असतात तर सून कुटुंबाची परंपरा पुढे नेते. जावई मुलाप्रमाणे सेवा करतो. म्हणून त्यांच्याशी वाद नसावा.

## समर्थांचं सद्गुरुस्तवन

प्रत्येकाच्या आयुष्यात सद्गुरुचं स्थान महत्त्वाचं असतं. समर्थ रामदास सद्गुरुस्तवन करताना दिसतात. ते म्हणतात,

जया जया जी सद्गुरुराजा। विश्वंभरा विश्वबीजा। परम पुरुषा मोक्षध्वजा। दीनबंधु। तुझीयेन अभयंकरे। अनावर माया हे वोसरे। जैसे सूर्यप्रकाशे अंधारे। पळोन जाये। आदित्य अंधकार निवारे। परंतु मागुते ब्रह्मांड भरे। नीसी जालिया नंतरे। पुन्हा काळोखे। तैसा नव्हे स्वामीराव। करी जन्म-मृत्यू वाव। समूळ अज्ञानाचा ठाव। पुसून टाकी।



इथे सद्गुरुला वंदन करुन समर्थ रामदास त्याच्या कृपेची करुणा भाकत आहेत. अंतरामधील विचार गणेशकृपेने ज्ञात झाला, शारदेच्या कृपेने त्याला शब्दरुप प्राप्त झालं तरी त्याचा विचार परिपूर्ण होण्याची वाट दाखवण्यासाठी सद्गुरुचं मार्गदर्शन आवश्यक असतंच. अंधाऱ्या रात्री चालताना आपल्याला नेत्रांच्या रुपाने पाहण्याची शक्ती असते, पूर्वी कधीतरी दिवसा वाट पाहिलेली असते परंतु काळोखात या दोन्हीचा काहीच उपयोग होऊ शकत नाही. त्यामुळे मार्ग दाखवण्यासाठी पथप्रदीप म्हणून दिवा लागतोच. अगदी त्याचप्रमाणे प्रपंच काय आणि परमार्थ काय, वाचन काय, निरुपण काय आणि त्याचं लेखन काय... सद्गुरुच्या कृपारुपी मार्गदर्शनाशिवाय सिद्धीस जात नाही.

दासबोधातून...

अशा या गुरुचं वर्णन करण्यास शब्दच तोकडे आहेत तेथे मला अज्ञान्याला ते स्वरुप कसं कळेल अशा कारुण्यपूर्ण प्रार्थनेने श्रीसमर्थ समासाची सुरुवात करतात. ज्याचं स्वरुप श्रुतींनाही समजलं नाही, मायेलाही उमगलं नाही, त्याचे गुणवर्णन मी कसं करु शकणार? परमात्मा भेटत नाही तोवर त्याची प्रतिमा कल्पून सगुण रुप मनातील भावभक्तीप्रमाणे पूजन करतो तसं मी सद्गुरुचं स्तवन करतो असं समर्थ सांगतात.

## पती-पत्नींमधलं नातं फुलवताना...

सध्याच्या काळात बऱ्याच जोडप्यांमध्ये वादविवाद होत असतात. बरीच लग्न मोडण्यापर्यंत येऊन ठेपतात. पती-पत्नींमध्ये बेबनाव होतो. यामागे अनेक कारणं असतात. पण काही मार्गांचा अवलंब करून आपण हे हळवं नातं फुलवू शकतो. नात्यातला गोडवा टिकवून ठेवण्यासाठी पती-पत्नींनी काय करावं याविषयी...

* पती-पत्नींनी मित्रभाव जपायला हवा. पती असल्यामुळे आपण श्रेष्ठ असा भाव पतीने मनात आणू नये तर आपल्याशिवाय कोणाचं पान हलणार नाही, असा विचार पत्नीने करू नये. घरात दोघांनी चांगल्या मित्रांप्रमाणे राहावं.

* पतीने पत्नीचं कौतुक करायला हवं. तिच्याशी प्रेमाने वागायला हवं. प्रेमाचे दोन शब्द बोलायला हवे. पत्नीला आपल्या प्रेमाची जाणीव करून द्यायला हवी. यामुळे पती-पत्नीचं नातं फुलू शकेल.

* दोघांच्या संवादात माधुर्य असायला हवं. अशी



पत्नी आपल्याला मिळू शकणार नाही, असं पतीला वाटलं पाहिजे. तर दुसरीकडे आपल्याला लाखात एक पती मि ळाल्याची पत्नीची भावना असायला हवी.


* एकमेकांच्या कामांमध्ये ढवळाढवळ करू नये. दोघांनीही कामांची विभागणी करून घ्यावी. कोणावर कोणती जबाबदारी आहे याची लक्ष्मणरेषा आखावी. ही लक्ष्मणरेषा दोघांनीही ओलांडू नये.

* नात्यामध्ये विश्वास असावा. एकमेकांप्रती समर्पणाची भावना असावी. दोघांनी एकमेकांना दुखवू नये. फसवणूक करू नये.

स्वमदत

* पत्नीशी असणारं नातं बळकट करण्याचा प्रयत्न करावा. तिच्या कुटुंबियांप्रती प्रेम आणि आपुलकी दाखवावी. असं केलं तरच पत्नी तुमच्या कुटुंबियांशी आपलेपणाने वागेल हे पतीने लक्षात घ्यावं.

## जाणा ओमकाराची महती



मंत्रजागर

कोणत्याही मंत्राची सुरूवात ओमने करायला हवी. ओमकाराच्या निनादाशिवाय मंत्रांचं फळ मिळत नाही. विविध धर्मग्रंथांमध्ये ओमची महती वर्णन करण्यात आली आहे. याविषयी जाणून घेऊया.

* गोपथ ब्राह्मण या ग्रंथानुसार कोणत्याही मंत्राची सुरूवात ओमने करायला हवी. ओमशिवाय मंत्रांचे लाभ मिळत नाहीत. उलटपक्षी ओमकारामुळे मंत्रांचं फळ अनेक पटींनी वाढतं.

* ओम हे अक्षर म्हणजे ब्रह्म आणि हेच परब्रह्म असल्याचं कठोपनिषदात नमूद करण्यात आलं आहे. ओमकाराचं महत्त्व समजून दररोज त्याचा उच्चार करणाऱ्या माणसाच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतात.

* ओमकाराचा जप सतत करत राहायला हवा असं मांडूक्य उपनिषदात सांगण्यात आलं आहे.

* मन स्थिर करून, ध्यानस्थ बसून ब्रह्मरूप अशा ओमकाराचा जप करत शरीराचा त्याग करणाऱ्या माणसाला सद्गती प्राप्त होते, असं गीता सांगते.

## कलियुगातले पांडव कोण?

जाणून घ्या


महाभारतातल्या अनेक प्रसंगांबाबत आपण अनभिज्ञ असतो. पांडवांनी कलियुगातही जन्म घेतला. पांडवांना कलियुगात जन्म का घ्यावा लागला, याबाबत भविष्यपुराणात सांगण्यात आलं आहे. त्यानुसार कुरूक्षेत्रावरील युद्धाच्या अखेरच्या काळात अश्वत्थामा, कृतवर्मा आणि कृपाचार्य मध्यरात्री पांडवांच्या शिबिरात गेले. या तिघांनी मनातल्या मनात शंकराची आराधना केली आणि त्याला प्रसन्न करून घेतलं. शंकराने त्यांना पांडवांच्या शिबिरात जाण्याची परवानगी दिली. त्यानंतर अश्वत्थामाने शंकराने दिलेल्या तलवारीच्या साह्याने पांडवांच्या सर्व पुत्रांचा वध केला. याबाबत कळल्यानंतर पांडव शिबिरात आले. शंकराने हे कृत्य केलं आहे असं वाटून पांडव त्याच्यासोबत युद्ध करायला निघाले. जवळ पोहोचलेल्या पांडवांकडची सगळी शस्त्र शिवाच्या शरीरात सामावून गेली.

पांडवांवर चिडलेल्या शंकराने त्यांना सांगितलं की, तुम्ही श्रीकृष्णाचे भक्त असल्याने या अपराधाची शिक्षा या जन्मात भोगावी लागणार नाही. पण कलियुगात जन्म घेऊन तुम्हाला हे भोग भोगावे लागतील. यानंतर पांडव कृष्णाकडे गेले. पुनर्जन्माबाबत कृष्णाला सांगितलं. तेव्हा श्रीकृष्णाने त्यांना कलियुगातल्या जन्माची माहिती दिली.

कलियुगात युधिष्ठिराचा जन्म वत्सराज नामक राजाच्या पोटी झाला. मलखान असं त्याचं नाव होतं. भीमाने विरण म्हणून जन्म घेतला. तो वनरसचा राजा बनला. अर्जुन परिलोक नावाच्या राजाच्या घरात जन्मला. ब्रह्मानंद असं त्याचं नाव होतं. कान्यकुब्जचा राजा रत्नभानूकडे नकुलचा जन्म झाला. लक्षण या नावाने तो ओळखला जात असे. सहदेवाने भीमसिंह नावाच्या राजाच्या घरात देवसिंह म्हणून जन्म घेतला. कर्णाने तारक राजाच्या रूपात जन्म घेतला.



## श्रीलक्ष्मीनृसिंह मंदिर



धार्मिक स्थान

भारतात श्रीविष्णूच्या विविध अवतारांची मंदिरं आहेत. पण नरसिंह अवताराची मंदिरं अगदीच मोजकी आहेत. गोव्यातल्या फोंडामधल्या वेलिंग गावात लक्ष्मीनृसिंह मंदिर आहे. या मंदिरातल्या नरसिंहाच्या मूर्तीच्या मांडीवर देवी लक्ष्मी विराजमान आहे. हिरण्यकश्यपु या राक्षसाचा वध करण्यासाठी विष्णूने नरसिंह अवतार घेतला. तोंड सिंहाचं आणि शरीर मनुष्याचं अशा रूपातल्या विष्णूने हिरण्यकश्यपुचं पोट फाडून वध केला. या मंदिरात दगड आणि लाकडापासून तयार केलेला देव्हारा आहे. हा देव्हारा अठराव्या शतकातला आहे. मंदिराचं छप्पर सोन्याप्रमाणे चकाकतं.

या मंदिरात सुंदर असं नक्षीकाम करण्यात आलं आहे. भिंती आणि छपरांवर बरीच चित्रं आहेत. या चित्रांमधून नरसिंह पुराणातल्या कथा साकारण्यात आल्या आहेत. इथे विष्णूच्या विविध अवतारांतील कार्य चित्ररूपात मांडण्यात आलं आहे. मंदिराच्या प्रांगणात तलाव आहे. या तलावात उतरून स्नान करता येतं. मंदिराचा परिसर निसर्गरम्य आहे. चहू बाजूंना नारळाची झाडं आहेत. थि विविध उत्सव साजरे केले जातात. फेब्रुवारी महिन्यात मंगेशाची जत्रा असते. रामनवमीही उत्साहात साजरी केली जाते. या ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक येतात.

## आयुष्य सार्थकी लावण्यासाठी...



आत्मबोध

परमेश्वराने मनुष्यप्राण्याला बुद्धिमत्ता आणि विचार करण्याच्या क्षमतेचं वरदान दिलं आहे. या बुद्धीचा सदुपयोग करून आयुष्य सार्थकी लावता येतं. एका कथेच्या माध्यमातून आपण हे जाणून घेऊ या...

एकदा एका शिष्याने गुरूला एक प्रश्न विचारला. तो म्हणाला की, गुरूजी या जगात जीव जन्माला येतो आणि मरतो. सर्वच प्राणीमात्रांना भूक लागते. रोग होतात. आनंद, दु:ख अशा भावनाही ते व्यक्त करतात. पण फक्त माणूसच वेगवेगळ्या भूमिका पार पडतो. तो साधू, संत असतो. चोर, दरोडेखोर असतो. दहशतवादीही माणसंच असतात. जाती, धर्म, वंश हे सगळं माणसाने निर्माण केलं आहे. असं का बरं? शिष्याचा हा प्रश्न ऐकून गुरूजी हसले आणि म्हणाले की, तू खूप चांगला प्रश्न विचारला आहेस. यामागचं महत्त्वाचं कारण म्हणजे माणसाला मिळा- लेली बुद्धी. या बुद्धीचा वापर कसा करायचा हे त्याने ठरवायचं. माणूस साधू, संत बनून राहू शकतो. पण तो आपल्या बुद्धीचा चुकीचा वापर करतो. आपल्या मार्गातून भरकटतो. म्हणूनच सम ाजात वेगवेगळ्या प्रकारची माणसं आढळतात. बुद्धीचा योग्य वापर केला तर मनुष्य काहीही करू शकतो. चुकीचा वापर त्याला विनाशाकडे नेतो.

बुद्धीचा चुकीचा वापर केल्याने माणूस वेगवेगळ्या जाती-धर्मांमध्ये विभागला गेला आहे. स्वार्थीभाव, मीपणा वाढल्याने जगात युद्ध होत आहेत. स्वत:ची सत्ता स्थापन करण्याची लालसा त्याला स्वस्थ बसू देत नाही. बुद्धीचा सदुपयोग करून तो पृथ्वीवर नंदनवन फुलवू शकला असता. पण प्रत्यक्षात असं झालेलं नाही. त्याने पृथ्वी उजाड, वैराण केली आहे. सगळीकडे प्रदूषण, अस्वच्छता आहे. प्रत्येक जण स्वत:पुरता विचार करत आहे. इतर कोणताही प्राणी असं करत नाही किंवा करू शकत नाही. बुद्धीचा वापरच माणसाला अधोगती किंवा प्रगतीकडे नेतो. याच बुद्धीमुळे माणूस इतर प्राणीमात्रांपेक्षा वेगळा ठरतो. गुरूचं हे उत्तर शिष्याला पटलं आणि बुद्धीचा सदुपयोग करायचा असं ठरवलं.

दैनिक निशस्त्र योद्धा हे पत्र मालक, प्रकाशक सुबोध केशवराव आखाडे यांनी मुद्रक लिंमरा प्रिंटिंग प्रेस मुद्रण स्थळ मलकापूर जिल्हा बुलढाणा (महा) येथून मुद्रित करून दैनिक निशस्त्र योद्धा कार्यालय डोणगाव, ता. मेहकर, जि. बुलढाणा (४४३३०३) येथून प्रकाशित केले. संपादक सुबोध केशवराव आखाडे मो.९०२८४००७७७ प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी आर बी ऍक्ट नुसार मुद्रक व संपादक जबाबदार राहतील असे नाही.) (सर्व वाद विवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत राहतील. ) R>N>I MH$MAR>/26/A1288

Printed at Limra Printing Press, Malkapur, District Buldhana (Maharashtra) and Published by Subodh Keshavrao Akhade on behalf of Daily Nishastra Yoddha, Published from Daily Nishastra Yoddha Office, Dongaon, Taluka Mehkar, District Buldhana – 443303 (Maharashtra). Editor: Subodh Keshavrao Akhade. Mobile: +91 9028400777. The views expressed in the articles and news published are not necessarily those of the Editor. As per the PRB Act, the Printer and Editor shall not be held responsible for the same. All disputes are subject to Mehkar Court jurisdiction only.

# मृतदेहाजवळ कुत्रा बसून राहिला!



हिमाचल प्रदेशातील बर्फाच्छादित पर्वतातून एक हृदय हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. चार दिवस प्रचंड थंडी, बर्फवृष्टी आणि जंगली प्राण्यांचा धोका असूनही एक पाळीव कुत्रा आपल्या मालकाच्या मृतदेहाजवळून हलला नाही. या काळात त्याने ना काही खाल्लं ना पाणी प्यायला ना आसरा शोधला. 'रेस्क्यू पथक' घटनास्थळी पोहोचल्यावर हा प्रसंग पाहून अनेकांचे डोळे पाणावले. घटना हिमाचल प्रदेशातील चंबा जिल्ह्यातील भरमौर परिसरातील आहे.

विकसित राणा (वय १९) आणि त्याचा मावसभाऊ पीयूष (वय १३) हे दोघे प्रसिद्ध भरमाणी माता मंदिरात दर्शनासाठी गेले होते. त्यांच्यासोबत पीयूषचा पाळीव पिटबुल कुत्राही होता. दर्शनानंतर मंदिराच्या वरच्या भागात व्हिडीओ शूट करण्यासाठी गेले असताना अचानक जोरदार हिमवृष्टी सुरू झाली आणि दोघेही वाट चुकले. त्या दिवशी परिसरात सुमारे पाच फूट बर्फ साचला होता. संध्याकाळपर्यंत दोघांनी घरी फोन करून आपण सुरक्षित असल्याचे सांगितले होते; मात्र त्यानंतर संपर्क तुटला. पुढील चार दिवस ते बेपत्ता होते. अखेर 'रेस्क्यू टीम' घटनास्थळी पोहोचली.

डोंगर उतारावर एका झाडाजवळ पीयूषचा मृतदेह आढळून आला. त्याच्या जवळच त्याचा कुत्रा बसलेला होता अत्यंत अशक्त अवस्थेत, गळ्याला किरकोळ जखम झालेली; पण तरीही मालकाला सोडायला तयार नव्हता. 'रेस्क्यू टीम'च्या सुरक्षिततेसाठी कुत्र्याला सौम्य भूल देऊन मृतदेह बाहेर काढण्यात आला. काही अंतरावर एका नाल्यात विकसित राणाचा मृतदेही सापडला. कुत्र्याला आणि पीयूषचा मृतदेह हेलिकॉप्टरद्वारे भरमौर हेलिपॅडवर आणण्यात आला आणि नंतर कुत्र्याला कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले. या कठीण शोधमोहिमेत स्थानिक प्रशासन, पोलिस, वायुदल, पर्वतारोहक पथके आणि ग्रामस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# रेल्वेला शिकवला धडा

भारतात ट्रेनच्या विलंबामुळे सर्वांनाच त्रास होतो; पण या विलंबाला कंटाळून एका विद्यार्थिनीने रेल्वेला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला. तिने न्यायालयात खटला दाखल केला आणि मोठ्या दंडाची मागणी केली. शेवटी तिचा विजय झाला.

ही घटना उत्तर प्रदेशातील बस्ती जिल्ह्यात घडली. तिथे एका विद्यार्थिनीची ट्रेनच्या विलंबामुळे 'नीट'ची परीक्षा चुकली. तिचे संपूर्ण वर्ष वाया गेले. पीडित विद्यार्थिनीने तिच्या वकिलामार्फत रेल्वेला धडा शिकवण्यासाठी दंडाची मागणी केली. वर्षभर चाललेल्या खटल्यानंतर, ग्राहक मंचाने विद्यार्थिनीचे आरोप खरे असल्याचे आढळले आणि रेल्वेला मोठा दंड ठोठावला. कोतवाली पोलिस ठाणे परिसरातील पिकोरा बक्ष परिसरातील रहिवासी समृद्धी ही 'नीट' परीक्षेची तयारी करत होती. तिचे परीक्षा केंद्र लखनऊमधील जयनारायण पीजी कॉलेजला देण्यात आले होते. परीक्षा देण्यासाठी, विद्यार्थिनीने बस्तीहून इंटरसिटी सुपरफास्ट ट्रेनचे तिकीट बुक केले. ट्रेन सकाळी ११ वाजता लखनऊला पोहोचणार होती; परंतु विलंबामुळे ट्रेन नियोजित वेळेपेक्षा अडीच तास उशिरा पोहोचली. विद्यार्थिनी दुपारी १२:३० वाजता परीक्षा केंद्रावर पोहोचणार होती. त्यामुळे तिची परीक्षा चुकली.

यामुळे अस्वस्थ झालेल्या विद्यार्थिनीने ग्राहक आयोगाकडे प्रकरण नेले आणि रेल्वेला त्याचे परिणाम भोगावे लागले. जिल्हा ग्राहक आयोगाचे अध्यक्ष, न्यायाधीश अमरजीत वर्मा आणि सदस्य अजय प्रकाश सिंह यांनी रेल्वेला दंड ठोठावला आणि विद्यार्थिनीला नऊ लाख दहा हजार रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले. न्यायालयाने असेही म्हटले आहे, की रेल्वेने भरपाई देण्यास उशीर केला तर त्यांना १२ टक्के रक्कम व्याज म्हणून द्यावी लागेल. समृद्धीचे वकील प्रभाकर मिश्रा यांनी स्पष्ट केले, की ती ७ मे २०१८ रोजी नीट परीक्षा देण्यासाठी लखनऊला गेली होती. तथापि, ट्रेनच्या उशिरामुळे समृद्धीला परीक्षेपासून वंचित राहावे लागले आणि तिचे संपूर्ण वर्ष वाया गेले. त्यांनी जिल्हा ग्राहक आयोगाकडे खटला दाखल केला. रेल्वे मंत्रालय, रेल्वे महाव्यवस्थापक आणि स्टेशन अधीक्षकांना नोटीस पाठवण्यात आल्या; परंतु कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, ११ सप्टेंबर २०१८ रोजी न्यायालयात खटला दाखल करण्यात आला.

हा खटला सात वर्षांहून अधिक काळ चालला. आयोगाने दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले आणि रेल्वेने ट्रेनच्या विलंबाची कबुली दिली, परंतु विलंबाचे कारण स्पष्ट केले नाही. न्यायालयाने दंड ठोठावला आणि रेल्वेला ४५ दिवसांच्या आत नऊ लाख दहा हजार रुपये भरण्याचे निर्देश दिले.

# कॅलिडोस्कोप



# हिमालयापेक्षाही जुनी नदी!

भारताची संस्कृती आणि इतिहासात डोकावलं असता अनेकदा काही भारावणारे संदर्भ डोळ्यांसमोर येतात आणि थक्क करून जातात. असेच संदर्भ देशातील नद्यांबाबतही आढळतात. नद्यांच्या उगमाच्या कथा अनेकदा विचार करायला भाग पाडतात, तर काही प्रसंग आख्यायिकांच्या रंजकतेच्या बळावर खिळवून ठेवतात.

ही आहे, भारतातील सर्वात प्राचीन नर्मदा नदी. माघ महिन्यातील शुक्ल पक्षाच्या सप्तमीला या नदीचा उगम झाल्याचं म्हटलं जात असून, यंदा हा दिवस २५ जानेवारी रोजी आल्याने या नदीच्या जयंतीचा उत्सव साजरा झाला. मध्य प्रदेशातील अमरकंटक या ठिकाणी उगम पावणारी ही नदी मूळ उगमापासून १३ हजार किलोमीटर दूरपर्यंत वाहत जात तिचा प्रवाह पुढे खंबातच्या खाडीद्वारे सागराशी एकरूप होतो. हिंदूंसाठी नर्मदा ७ पवित्र नद्यांपैकी एक असून, ही भारतातील प्राचीन नदी आहे. इतकंच नव्हे, तर असंही म्हटलं जातं, की नर्मदा ही गंगा नदीपेक्षा ५ पटींनी जुनी आहे.

पुराणांपासून अगदी विज्ञानानंही नर्मदा नदीच्या आयुमानावर शिक्कामोर्तब केलं आहे. या नदीच्या उगमाबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. या नदीचा उगम भगवान शंकराच्या घामातून झाल्याचं म्हटलं जातं. आणखी एका कथेनुसार भगवान शंकरानं नर्मदा नदीतील प्रत्येक खडकाला शंकराच्या रुपात पुजण्याचं वरदान दिल्यानं या नदीतील प्रत्येक दगड हा शिवलिंगाप्रमाणं पूजनीय ठरतो अशी धारणा आहे. धर्म-शास्त्रांनुसार या नदी ही २५ कोटी वर्षं जुनी असून, हिमालय पर्वत आणि गंगा नदी ३ ते ५ कोटी वर्षांपूर्वीची असल्याचं म्हटलं जातं.




नर्मदा नदीला २५ कोटी वर्षे झाल्याचं सांगण्यामागे आणखी एक तर्क असून, त्यामागचं कारण सांगण्यात येतं, की नर्मदा नदीच्या पाण्यावर मगरींचं राज्य आहे. याच म गरींचं अस्तित्वं पृथ्वीवर २५ कोटी वर्षांपासून आहे. गोड्या पाण्यातील या मगरी जगातील इतर मगरींपेक्षा वेगळ्या असल्याचंही सांगण्यात येतं. काही वैज्ञानिक संदर्भांचा आधार घ्यायचा झाल्यास, नर्मदा नदीच्या खोऱ्याला जगातील काही प्राचीन नदी खोऱ्यांच्या श्रेणीत गणलं जातं. नर्मदा नदीमध्ये डायनासोरची अंडीसुद्धा सापडली असून, त्याशिवाय अनेक जीवांचे अवशेष आणि सापळे इथं सापडल्यानं ही नदी कोट्यवधी वर्षांपासून अस्तित्वात असल्याचं सांगण्यात येतं. या नदीचं आणखी एक महत्त्व म्हणजे देशातील बहुतांश मुख्य नद्या पश्चिमेपासून पूर्वेला बंगालच्या उपसागराच्या दिशेनं वाहतात; मात्र नर्मदेचा प्रवाह उलट असून, ती पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत वाहते.

# दोन महिने दिवसच!

दिवसानंतर रात्र येते आणि सूर्य मावळला की अंधार पसरतो; मात्र जगात एक असा देश आहे जिथे तब्बल दोन महिने सूर्य मावळतच नाही. ना पूर्ण रात्र होते, ना घनदाट अंधार. मध्यरात्रीही आकाशात सूर्य दिसत राहतो आणि आजूबाजूला मंद उजेड पसरलेला असतो. 'सोशल मीडिया'वर सध्या या अनोख्या देशाची मोठी चर्चा सुरू असून लोक याला निसर्गाचा अद्भुत चमत्कार म्हणत आहेत.

हा अनोखा देश म्हणजे नॉर्वे. नॉर्वेला जगभरात 'मिडनाइट सन' म्हणजेच अर्ध्या रात्रीच्या सूर्यासाठी ओळखले जाते. दरवर्षी काही महिन्यांसाठी नॉर्वेमध्ये जणू वेळच थांबल्यासारखा भास होतो. येथे संध्याकाळ होते; पण पूर्ण अंधार कधीच होत नाही. नॉर्वे आर्क्टिक सर्कलच्या अत्यंत जवळ असण्याचे देश आहे. त्याची भौगोलिक रचना आणि पृथ्वीवरील स्थान यामुळेच तिथे ही अद्भुत नैसर्गिक घटना घडते. दरवर्षी मे ते जुलै या कालावधीत सुमारे ७६ दिवसांपर्यंत नॉर्वेमध्ये सूर्य अस्ताला जात नाही.

सूर्य क्षितिजाजवळ फिरत राहतो; मात्र पूर्णपणे खाली मावळत नाही. त्यामुळे मध्यरात्रीही आकाशात उजेड कायम राहतो.



या काळात पृथ्वीचे फिरणे अंधाराला नॉर्वे जवळील काही भागांपर्यंत घेऊन येते; मात्र नॉर्वे देशाला संपूर्णपणे अंधारात लपेटू शकत नाही. अंधार जणू या देशाला स्पर्श करून पुढे निघून जातो.

दरम्यान, येथे फक्त हलकीशी संध्याकाळ अनुभवायला मिळते पण पूर्ण रात्र कधीच होत नाही. सोशल मीडियावर नॉर्वेच्या मिडनाइट सनचे फोटो आणि व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असतात. हे दृश्य पाहून लोक आश्चर्यचकित होतात.

# एकमेव करमुक्त राज्य!

भारतात व्यवसाय करणारे टॅक्स सिस्टीममुळे वैतागले आहेत. फक्त व्यावसायिकच नाही, तर भारतात गरीब श्रीमंत प्रत्येकालाच कर भरावा लागतो. भारतात कर भरणे भरणे प्रत्येकाला कायद्याने बंधनकारक आहे; मात्र देशातीलच एक राज्य पूर्णपणे टॅक्स फ्री आहे. इथे करोडो रुपये कमावले, तरी देखील एक रुपयाचाही कर भरावा लागत नाही.

सिक्कीम हे भारतातील एकमेव 'टॅक्स फ्री' राज्य आहे. सिक्कीला भारतीय प्रजासत्ताकात विशेष दर्जा प्राप्त जाला आहे. यामुळे येथील नागरिकांना करातून १०० टक्के सूट मिळते. इथे लोक कितीही कमावत असले, तरी त्यांना प्राप्तिकर भरावा लागत नाही. भारतीय संविधानाच्या कलम ३७१(एफ) आणि प्राप्तिकर कायदा १९६१ च्या कलम १०(२६एए) अंतर्गत सिक्कीम राज्यात ही सुविधा लागू करण्यात आली आहे. १९७५ मध्ये सिक्कीमला हा करमुक्त विशेष दर्जा मिळाला. त्या वेळी सिक्कीम हे राज्य भारतीय संघराज्यात सामील झाले नव्हते. सिक्कीमची आर्थिक स्थिती मजबूत करणे आणि तेथील नागरिकांना आर्थिक स्वातंत्र्य प्रदान करणे हा या विशेष अधिकाराचा उद्देश होता. सिक्किममधील नागरिकांना मिळणारी ही कर सवलत फक्त प्राप्तिकरातून तसेच वैयक्तिक उत्पन्नापुरती मर्यादित नाही, तर ही रोख्यांवर मिळणारे व्याज आणि लाभांशावरही लागू होते. सिक्कीम करमुक्त ठेवण्याचा निर्णय राज्याच्या आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरला आहे. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे, तर पर्यटन हादेखील राज्यातील प्रमुख व्यवसाय आहे. सर्व व्यवहार करमुक्त होत असल्याने नागिकांना कमाईची मोठी संधी मिळते. त्यामुळे त्यांची बचत होऊन त्यांना अधिक गुंतवणूक करता येते. या धोरणामुळे राज्याची आर्थिक स्थिती मजबूत झाली आहे. सिक्कीमचे हे करमुक्त मॉडेल देशभरात चर्चेचा विषय बनले आहे. इतर राज्यांनीही अशी धोरणे स्वीकारल्यास भारताची एकूण आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होऊ शकते.



# मेटिंगशिवाय गर्भधारणा

गर्भधारणेसाठी शुक्राणू आणि स्त्रीबीज या दोहोंची गरज असते. मादी मेटिंगशिवाय गर्भार राहू शकत नाही. आयव्हीएफ तंत्रज्ञानातही शुक्राणू आणि स्त्रीबीजाचं कृत्रिम पद्धतीने मीलन घडवून आणलं जातं. पण एका विशिष्ट प्रजातीच्या सापाची मादी मेटिंगशिवाय गरोदर राहू शकते. शास्त्रज्ञांनी उत्तर अमेरिकेतल्या पीट वायपर आणि कनेक्टिकटमध्ये आढळणाऱ्या कॉपरहेड सापांचा बारकाईने अभ्यास करून काही निष्कर्ष काढले आहेत. यानिमित्ताने 'बोआ कॉन्स्ट्रिक्टर' प्रजातीच्या सापाच्या मादीतली अलैंगिक प्रजननाची क्षमता जगापुढे आली आहे. नॉर्थ कॅरोलिना स्टेट विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं. या सापाच्या बऱ्याच मादी पिलांच्या जन्मात नर सापाचं कोणतंही योगदान नसल्याची बाब त्यांनी हेरली. अलैंगिक प्रजननाला शास्त्रीय भाषेत 'फॅकल्टेटिव्ह पार्थेनोजेनेसिस' असं म्हणतात. या तंत्रज्ञानात मादीच्या गर्भाशयात शुक्राणूंशिवाय अंडी किंवा गर्भ राहतो. सापांच्या या प्रजातीत आढळणारा हा गुणधर्म निसर्गाचा चमत्कारच म्हटला पाहिजे. ही अत्यंत दुर्मीळ बाब असल्याचं शास्त्रज्ञ सांगतात. नर सर्पांमध्ये दोन झेड क्रोमोसोम्स असतात तर मादी सर्पात एक झेड आणि एक डब्ल्यू झेड क्रोमोसोम आढळतो. असं असताना अलैंगिक प्रजननाद्वारे जन्म लेल्या मादी सापांमध्ये डब्ल्यू डब्ल्यू क्रोमोसोम आढळले आहेत. या पद्धतीने जन्मलेला मादी सापांचा रंग आईसारखा असतो. त्यांचे लैंगिक क्रोमोसोम्सही नैसर्गिक प्रजननाद्वारे जन्मलेल्या सापांपेक्षा भिन्न असतात. 'बोआ कॉन्स्ट्रिक्टर' ही प्रजाती मध्य आणि दक्षिण अमेरिकेत आढळते. इतर सापांच्या तुलनेत त्यांची पचनशक्ती बरीच जास्त असते. या सर्पाची मादी एका वेळी ६० पिलांना जन्म देऊ शकते.



# रणकपूरचं अनोखं जैन मंदिर

भारतात हजारो मंदिरं आहेत. त्यांच्याशी संबंधित अनेक पौराणिक कथा तसंच त्यांची अनेक वैशिष्ट्यंही आहेत. स्थापत्यकला, नक्षीकाम, रचनेमुळे लोकप्रिय ठरलेली मंदिरं पाहण्यासाठी देशी-विदेशी पर्यटकांची गर्दी होत असते. असंच एक संगमरवरी मंदिर राजस्थानातल्या उदयपूरमध्ये वसलंय. जैन धर्मीयांचं श्रद्धास्थान असणारं हे मंदिर १५०० खांबांवर उभं असून उदयपूरपासून १०० किलोमीटरवर असणाऱ्या रणकपूरचं हे एक खास वैशिष्ट्य मानलं जातं. जैनांच्या पाच प्रमुख स्थानांमध्ये याचा समावेश असून इथलं सौंदर्य नजरेत भरण्यासारखं आहे. मंदिराच्या खांबांवर सुंदर नक्षीकाम करण्यात आलं आहे. संगमरवरातून साकारलेल्या या मंदिराच्या दारांच्या रचनेत कलात्मकता ठासून भरली आहे. गाभाऱ्यात तीर्थंकर आदिनाथाच्या संगमरवरात घडवलेल्या चार भव्य मूर्ती आहेत. पंधराव्या शतकात राणा कुंभाच्या राजवटीदरम्यान मंदिर बांधण्यात आलं. मंदिरात बरीच तळघरं आहेत. संकटकाळी मूर्ती लपवता याव्या या हेतूने इथल्या तळघरात त्या लपवण्याची सोय केलेली दिसते. असं हे मंदिर आश्चर्यच म्हटलं पाहिजे.



# वर्ण उजळवणारी आग

सुंदर दिसण्यासाठी वेगवेगळे फंडे अनुसरले जातात. या तंत्रज्ञानाच्या युगात सौंदर्य जपण्यासाठी वेगवेगळी तंत्र अवलंबली जातात. शस्त्रक्रिया करून बसकं नाक सरळ केलं जातं. चेहऱ्यावर पडू पाहणाऱ्या सुरकुत्या थोपवण्यासाठी नानाविध थेरपींचा अवलंब होतो. आधुनिक तंत्र आणि उपचारामुळे सावळ्या मुलीही गोऱ्या दिसू लागतात. थोडक्यात काय, आता सौंदर्यक्षेत्रात अशक्य असं काहीही राहिलेलं नाही. फॅशनच्या जगात कधी कुठला ट्रेंड येईल सांगता येत नाही. व्हिएतनाममध्ये 'फायर ट्रिटमेंट' किंवा 'फायर थेरपी'द्वारे सौंदर्य खुलवण्याचा भन्नाट प्रयोग सुरू आहे. आपण आगीपासून चार हात लांबच राहतो. पण हीच आग वर्ण उजळू शकते यावर आपल्याला विश्वास ठेवावा लागेल. सध्या व्हिएतनाममधल्या पुरुष आणि महिलांना सुंदर दिसण्याच्या महत्त्वाकांक्षेने झपाटलं आहे. इथली सलून्स आणि स्पा फायर थेरपीद्वारे त्यांना सुंदर बनवण्यास सज्ज आहेत. या उपचारात अंगावर टॉवेल टाकून त्याला आग लावण्यात येते. ३० सेकंद ते एक मिनिटापर्यंत हा प्रकार सुरू राहतो. या प्रकारामुळे सौंदर्यवृद्धी होतेच शिवाय निद्रानाश, डोकेदुखी, अंगदुखी यासारख्या समस्याही दूर होत असल्याचा दावा आहे. या थेरपीदरम्यान योग्य ती काळजी घेतली जाते असं तज्ज्ञ सांगतात. फायर थेरपीमुळे सुरकुत्यांचं प्रमाण कमी होत असल्याचं सांगितलं जातं. चीनमध्येही या तंत्राची चलती आहे. तिथे याला 'फ्लेम फेशियल' असं म्हणतात. ही थेरपी देताना अंगावर टाकल्या जाणाऱ्या टॉवेलवर अल्कोहोल शिंपडतात. प्रशिक्षित तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही सर्व प्रक्रिया होत असल्यामुळे काळजीचं कारण नसल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे कधी व्हिएतनामला भेट दिली तर फायर थेरपी तुमच्या बकेट लिस्टमध्ये असू द्या.



# दक्षिण आफ्रिकेला हरवत न्युझीलंडच्या क्रिकेट संघाने केली मालिकेत बरोबरी

## देव्हॉन कॉनवे सामनावीर, सिअर्स-फर्ग्युसनचे प्रत्येकी ३ बळी

**हॅमिल्टन/वृत्तसंस्था :**

**संक्षिप्त धावफलक**

- **न्यूझीलंड :** 20 षटकांत 6 बाद 175 (कॉनवे 60, निक केली 21, सॅंटनर 20, क्लार्कसन नाबाद 26, मॅकॉंची नाबाद 18, अवांतर 10, मुल्डर 2-14, कोएत्झी, बार्टमन, केशव महाराज आणि लिन्डे प्रत्येकी 1 बळी).
- **द.आफ्रिका :** 15.3 षटकांत सर्वबाद 107 (लिन्डे 33, हर्मन 19, स्मिथ 12, फॉरेस्टर 10, फर्ग्युसन व सिअर्स प्रत्येकी 3 बळी, सॅंटनर 2-19, मॅकॉंची आणि नीशम प्रत्येकी 1 बळी).

'सामनावीर' देवॉन कॉनवेचे अर्धशतक तसेच लॉकी फर्ग्युसन, बेन सीअर्स आणि सॅंटनर यांच्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर यजमान न्यूझीलंडने मंगळवारी येथे खेळविण्यात आलेल्या दुसऱ्या सामन्यात द. आफ्रिकेचा 68 धावांनी पराभव करत 5 सामन्यांच्या टी-20 मालिकेत 1-1 अशी बरोबरी साधली.

या मालिकेतील पहिला सामना द. आफ्रिकेने जिंकून आघाडी मिळविली होती. या दुसऱ्या सामन्यात द. आफ्रिकेने नाणेफेक जिंकून न्यूझीलंडला प्रथम फलंदाजी दिली. न्यूझीलंडने 20 षटकांत 6 बाद 175 धावा जमविल्या. त्यानंतर द. आफ्रिकेचा डाव 15.3 षटकांत 107 धावांत आटोपला. न्यूझीलंडच्या देव्हॉन कॉनवेने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील 6 हजार धावांचा टप्पा ओलांडला.

कॉनवे आणि टॉम लॅथम या सलामीच्या जोडीने 39 चेंडूत 48 धावांची भागिदारी केली. द. आफ्रिकेच्या अचूक गोलंदाजीसमोर दुसऱ्या बाजूने न्यूझीलंडचे फलंदाज ठराविक अंतराने बाद होत असताना कॉनवेने समयोचित खेळी करत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. कॉनवेने 49 चेंडूत 2 षटकार आणि 5 चौकारांसह 60 तर लॅथमने 1 षटकार आणि 1 चौकारासह 11, निक केलीने 12 चेंडूत 4 चौकारांसह 21, कर्णधार सॅंटनरने 14 चेंडूत 1 षटकार आणि 2 चौकारांसह 20 धावा जमविल्या. मॅकॉंची आणि क्लार्कसन या जोडीने सातव्या गड्यासाठी अभेद्य 35 धावांची भागिदारी केल्याने न्यूझीलंडला 175 धावांपर्यंत मजल मारता आली. मॅकॉंचीने 12 चेंडूत 1 षटकार आणि 1 चौकारासह नाबाद 18 तर क्लार्कसनने 9 चेंडूत 2 षटकार आणि 2 चौकारांसह नाबाद 26 धावा जमविल्या. न्यूझीलंडच्या डावात 7 षटकार आणि 15 चौकार नोंदविले गेले. द. आफ्रिकेतर्फे मुल्डेरने 14 धावांत 2 तर कोएत्झी, मोकोएना, केशव महाराज आणि लिन्डे यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला. न्यूझीलंडने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 43 धावा जमविल्या तर कॉनवेने 2 षटकार आणि 5 चौकारांसह 39 चेंडूत अर्धशतक झळकविले.

प्रत्युत्तरादाखल खेळताना न्यूझीलंडच्या शिस्तबद्ध आणि भेदक गोलंदाजीसमोर द. आफ्रिकेचा डाव 15.3 षटकांत 107 धावांत आटोपला. जॉर्ज लिन्डेने सर्वाधिक म्हणजे



12 चेंडूत 3 षटकार आणि 3 चौकारांसह 33, रु बन हर्मनने 12 चेंडूत 1 षटकार आणि 2 चौकारांसह 19, निक स्मिथने 1 चौकारासह 12, फॉरेस्टरने 1 चौकारासह 10 धावा केल्या. मुल्डरने 20 चेंडूत 1 षटकार आणि 1 चौकारासह 16 धावा जमविल्या. द. आफ्रिकेच्या डावात 6 षटकार आणि 8 चौकार नोंदविले गेले. द. आफ्रिकेने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 31 धावा जमविताना 2 गडी गमविले. न्यूझीलंडतर्फे फर्ग्युसनने 16 धावांत 3, सिअर्सने 14 धावांत 3, सॅंटनरने 19 धावांत 2 तर मॅकॉंची आणि नीशम यांनी प्रत्येकी 1 बळी घेतला. आता या मालिकेतील तिसरा सामना 20 मार्च रोजी ऑकलंडमध्ये खेळविला जाईल.

# कोहली, भुवनेश्वर कुमार, पडिक्कल आरसीबी शिबिरात दाखल

**बेंगळूर/वृत्तसंस्था :**



भारतीय क्रिकेटचा दिग्गज चेहरा विराट कोहली आणि स्टार खेळाडू भुवनेश्वर कुमार व देवदत्त पडिक्कल हे इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) 2026 च्या हंगामापूर्वी संघाच्या शिबिरात दाखल झाले आहेत.

आरसीबी आपल्या विजेतेपदाच्या बचावाची सुरूवात बेंगळूर येथील त्यांच्या घरच्या मैदानावर, एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबाद (एसआरएच) विरुद्ध करेल. महिला संघ सध्याच्या वूमन्स प्रमीयिर लीग (डब्ल्यूपीएल) स्पर्धेचा विजेता असल्याने पुरूष संघाचेही लक्ष्य हे विजेतेपद कायम राखणे आणि आरसीबीच्या अलिकडील सुवर्णकाळाची घोडदौड पुढे चालू ठेवणे हेच असेल. सध्या आरसीबी हे भारतीय फ्रॅंचायझी क्रिकेटचे किंग आणि क्वीन्स आहेत. कारण आयपीएल आणि डब्ल्यूपीएल या दोन्ही स्पर्धांच्या ट्रॉफी एकाचवेळी आपल्याकडे बाळगणारा हा पहिलाच संघ ठरला आहे.

किंग आपल्या राज्यात दाखल झाल्याची चिन्हे खरोखरच दिसून येत होती. कारण वाहतूक सिग्नलवर त्याचा जर्सी क्रमांक असलेला 18 हा आकडा प्रदर्शित करण्यात आला होता आणि चाहतेही विराटसोबत फोटो काढण्याची संधी मिळविण्यासाठी धावपळ करताना दिसून आले. आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणारा हा फलंदाज आता अधिक मुक्तपणे आणि निर्भयपणे खेळेल. कारण गेल्या हंगामात अहमदाबाद येथे झालेल्या विजेतेपदाच्या अटीतटीच्या लढतीत पंजाब किंग्जला पराभूत करुन, त्याने अखेर बहुप्रतिक्षीत विजेतेपद पटकावले आणि आपल्यावरील मोठा मानसिक दबाव दूर केला.

सध्या 267 सामन्यांमध्ये 8661 धावा, 8 शतके आणि 63 अर्धशतके अशी कामगिरी असलेल्या विराटचे लक्ष्य आयपीएलच्या इतिहासात 9000 धावांचा टप्पा गाठणारा पहिला खेळाडू बनणे हे देखील असेल. आयपीएल आणि आता बंद झालेली चॅम्पियन्स लीग टी-20 या दोन्ही स्पर्धांमध्ये आरसीबीकडून 282 सामन्यांत 9085 धावा केल्या.

# भारत चीनसोबत एकाच गटात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**

डेन्मार्कच्या हॉर्सेन्स येथे 24 एप्रिल ते 3 मे या कालावधीत होणाऱ्या 2026 च्या थॉमस आणि उबर चषकासाठी भारतीय पुऊष आणि महिला संघांचे गट बुधवारी जाहीर करण्यात आले. यामध्ये दोन्ही भारतीय संघांना गतविजेत्या चीनसोबत एकाच गटात स्थान मिळाल्याने त्यांच्यासमोर एक आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाली आहे.

संघातील खेळाडूंच्या जागतिक क्रमवारीच्या आधारे या स्पर्धेत दोन्ही भारतीय संघांना आठवे मानांकन देण्यात आले आहे. या गटवारीची घोषणा 'बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन'ने बुधवारी केली. 2022 च्या थॉमस चषकाचे विजेते असलेल्या भारताला 'अ' गटातून उपांत्यपूर्व फेरीत पोहोचू शकणाऱ्या दोन संघांपैकी एक जागा मिळविण्याच्या दृष्टीने प्रबळ दावेदार मानले जात आहे. या गटात 'पॅन अॅम' विजेते कॅनडा आणि 'ओशेनिया' विजेते ऑस्ट्रेलिया यांचाही समावेश आहे.

मात्र, महिला संघासाठी बाद फेरीत पोहोचण्याचा मार्ग थोडा कठीण असणार आहे, कारण त्यांना 16 वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या चीनसोबतच युरोपियन सांघिक अजिंक्यपद स्पर्धेतील उपविजेते डेन्मार्क आणि कांस्यपदकविजेते युक्रेन यांच्या गटात ठेवण्यात आले आहे. 'आम्हाला एक समाधानकारक गटवारी मिळाली आहे आणि थॉमस व उबर या दोन्ही स्पर्धांमध्ये उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्याची आम्हाला चांगली संधी आहे. आमचा संघ अत्यंत मजबूत आहे आणि त्यांनी हे सिद्ध केले आहे की, ज्या दिवशी त्यांचा खेळ बहरेल, त्या दिवशी ते कोणत्याही अव्वल संघाचा पराभव करू शकतात. एकदा




का आम्ही उपांत्यपूर्व फेरीत पोहोचलो की, त्यानंतर काहीही शक्य आहे,' असे 'बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडिया'चे सरचिटणीस संजय मिश्रा यांनी या प्रतिष्ठित सांघिक स्पर्धांच्या गटवारीवर प्रतिक्रिया देताना म्हटले. भारतीय पुऊष संघाने 2022 च्या थॉमस चषकाचे विजेतेपद पटकावून इतिहास रचलेला असून महिला संघाने 2014 आणि 2016 च्या आवृत्त्यांमध्ये कांस्यपदक मिळवले होते.

# अर्लीन्स मास्टर्स सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत हरिहरन-अर्जुन दुसऱ्या फेरीत

**अर्लीन्स/वृत्तसंस्था :**

येथे सुरू असलेल्या अर्लीन्स मास्टर्स सुपर 300 बॅडमिंटन स्पर्धेत, भारताची पुरूष दुहेरी जोडी हरिहरन अमसकरुनन आणि एम. आर. अर्जुन यांनी उपांत्यपूर्व फेरीच्या दिशेने आगेकूच केली तर आकर्षी कश्यपने पात्रता फेरीत दोन विजय नोंदवत महिला एकेरीच्या मुख्य फेरीत प्रवेश मिळविला.

2025 मध्ये 'अल ऐन मास्टर्स सुपर 100', 'तुर्किये इंटरनॅशनल चॅलेंज' आणि 'तेलंगणा इंडियन इंटरनॅशनल चॅलेंज' या स्पर्धांत विजेत्या ठरलेल्या हरिहरन आणि अर्जुन या जोडीने, झेचियाच्या जिरी क्रॉल आणि ओन्ड्रेज क्रॉल यांच्यावर विजय मिळवला. झेचियाच्या या जोडीने पहिला गेम 10-21 ने गमावल्यानंतर सामन्यातून माघार घेतली. पुढील




फेरीत या भारतीय जोडीचा सामना स्कॉटलंडच्या अलेक्झांडर डन आणि अॅडम प्रिंगल यांच्याशी होईल.

तत्पूर्वी जागतिक क्रमवारीत 63 व्या क्रमांकावर असलेल्या आकर्षीने पात्रता फेरीत सर्वप्रथम आपलीच देशवासी असलेल्या श्रीयांशी वालिशेट्टीचा 21 -19, 17-21, 21-13 अशा गुणांनी पराभव केला. त्यानंतरच्या फेरीत तिने चीन तैपेईच्या ली वाय.एच. हिचा 21-17, 21-19 ने पराभव करत मुख्य फेरीत स्थान पक्के केले. मुख्य फेरीत तिचा सामना सिंगापूरच्या येओ जिया मिन हिच्याशी होईल.

पुरूष एकेरीच्या पात्रता फेरीत, एस. सुब्रमण्यन याला मलेशियाच्या ली झी जियाकडून 12-21, 18-21 अशा गुणांनी पराभव पत्करावा लागला. ली झी जिया हा पॅरिस ऑलिम्पिकमधील कांस्यपदक विजेता असून दुखापतींनी गाजलेल्या 2025 च्या हंगामात पाठीवर शस्त्रक्रियेऐवजी पुनर्वसनावर भर दिल्यानंतर तो सध्या स्पर्धेत पुनरागमन करण्याचा प्रयत्न करत आहे. महिला दुहेरीमध्ये भारताची जोडी अश्विनी भट के., आणि शिखा गौतम यांनी जपानच्या रुई हिरोकामी आणि सायका होबारा या जोडीला पुढे चाल दिली.




# गळ्यात कवड्याची माळ, कपाळाला मळवट; गश्मीरचा नव्या अवतारातला थरारक 'गोंधळ'

मराठी चित्रपटसृष्टीत सध्या चर्चेत असलेल्या 'सालबर्डी' या आगामी चित्रपटातील 'गोंधळ' गीतामुळे अभिनेता गश्मीर महाजनी पुन्हा एकदा लक्षवेधी ठरला आहे. येत्या १७ एप्रिल रोजी प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात गश्मीर एका पारंपरिक गोंधळीच्या भूमिकेत दिसणार असून त्याच्या दमदार सादरीकरणाने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

गोंधळी ही महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीतील एक महत्त्वाची परंपरा मानली जाते. गावोगावी फिरून आई जगदंबेचा जागर करणाऱ्या या कलाकारांची भक्ती आणि ऊर्जा मनाला स्पर्श करणारी असते. याच पार्श्वभूमीवर 'सालबर्डी' चित्रपटात सादर करण्यात आलेले गोंधळ गीत प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव देत आहे. "काळरातीचा जोर वाढला घोर..." या ओळींनी सजलेल्या या गीतात गश्मीरने पारंपरिक वेशभूषा, प्रभावी देहबोली आणि ऊर्जादायी नृत्याचा संगम साकारला आहे.

नुकतेच प्रदर्शित झालेले हे गाणे सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून प्रेक्षकांकडून त्याला जोरदार प्रतिसाद मिळत आहे. संबळाच्या ठेक्यावर सादर होणाऱ्या या



गोंधळामुळे चित्रपटातील रहस्यमय वातावरण अधिक गडद होत असल्याचे दिसते. गाण्याचे गीतकार मुकुंद भालेराव असून संगीतकार पद्मनाभ गायकवाड यांनी त्याला आकर्षक संगीत दिले आहे. गायक अजय गोगावले यांच्या दमदार आवाजामुळे गाण्याची प्रभावीता अधिक वाढली आहे, तर नृत्यदिग्दर्शन आशिष पाटीलने केले आहे.

या भूमिकेबद्दल बोलताना गश्मीर महाजनी म्हणाला की, "गोंधळ ही केवळ परंपरा नसून देवीभक्तीची ऊर्जादायी अभिव्यक्ती आहे. 'सालबर्डी'मधील माझी भूमिका कथानकाला वेगळी दिशा देणारी आहे. या गाण्याचे शूटिंग करताना अंगावर रोमांच उभे राहत होते, आणि तो अनुभव प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल याची मला खात्री आहे." 'सालबर्डी' हा चित्रपट महाराष्ट्रातील दुर्गम भागात घडणाऱ्या रहस्यमय घटनांवर आधारित आहे. नेब्यूला फिल्म्सच्या बॅनरखाली साकारलेल्या या चित्रपटाची निर्मिती अनिल देवडे पाटील, डॉ. गजानन जाधव आणि राम जाधव यांनी केली असून दिग्दर्शन रमेश साहेबराव चौधरी यांनी केले आहे. पूजा सावंत, शशांक शेंडे, ओंकार भोजने, भारत गणेशपुरे यांसह अनेक कलाकार या चित्रपटात झळकणार आहेत.

# नोरा फतेहीने 'सरके चुनर' गाण्यावर सोडलं मौन

नोरा फतेही 'सरके चुनर तेरी सरके' या अश्लील गाण्यामुळे चांगलीच ट्रोल होत आहे. नोराने 'सरके चुनर ' या गाण्यावर आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. नोराने निर्मात्यांवर गंभीर आरोप केले आहे.

नोरा फतेही 'सरके चुनर तेरी सरके' गाण्यामुळे प्रचंड ट्रोल होत आहे. हे गाणे 'केडी - द डेव्हिल' चित्रपटातील आहे. या गाण्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या गाण्यात अश्लील शब्द तसेच अश्लील डान्स स्टेप्समुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. 'सरके चुनर तेरी सरके' गाण्याचे संगीत दिग्दर्शक अर्जुन जान्या आहेत. गीत रकीब आलम यांनी लिहिले आहे आणि हे गाणे गायक मंगली यांनी गायले आहे. आता या गाण्यावर बॉलिवूड अभिनेत्री आणि डान्सर नोरा फतेहीने आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. तिने निर्मात्यांवर गंभीर आरोप केले आहे.

व्हिडीओमध्ये नोरा फतेहीने म्हटल्यानुसार, नोराने 'सरके चुनर' हे गाणे तीन वर्षांपूर्वी कन्नड भाषेत शूट केले आहे. अभिनेते संजय दत्त झळकणार असल्यामुळे तिने या गाण्याला होकार दिला. तिला मोठ्या अभिनेत्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. गाण्याच्या भाषांतराबद्दल सर्व निर्मात्यांवर अवलंबून असते. नोराला कन्नड समजत नसल्याने तिने निर्माते जे सांगत आहे, त्यावर विश्वास ठेवला. या गाण्याने हिंदी बोल खूप वाईट असल्याचे नोराने स्वतःने सांगितले आहे. तसेच या सर्वाची नोराला काहीच कल्पना नव्हती. नोराला हिंदी डबिंग विषयी काही माहिती नव्हते. तिला थेट लॉंच इव्हेंटमध्ये समजले.

नोरा फतेही व्हिडीओत म्हणाली की, "निर्मात्यांनी माझ्या परवानगीशिवाय हिंदीत व्हिडिओ बनवला. त्यानंतर त्यांनी माझा आणि संजय दत्त यांचा AI जनरेटेड फोटो तयार केला. " नोराला हिंदी समजत असल्यामुळे तिला गाण्याच्या लॉंच दरम्यान हे सर्व चुकीचे असल्याचे वाटले. त्यानंतर नोरा दिग्दर्शकाला बोलायला गेली. त्याला सांगितले की, "हे चुकीचे आहे. यावर प्रचंड टीका होणार...माझी प्रतिष्ठा पणाला लागली आहे..."

शेवटी नोरा म्हणाली की, "मी काय नेपो किड नाही. मला पाठिंबा देणारे, माझ्यावर प्रेम करणारे फक्त माझे प्रेक्षक आणि माझे चाहते आहेत. मी तुम्हाला विनंती करते की हे गाणे कुठेही शेअर करू नका...माझ्या चारित्र्यावर वाईट बोलणे थांबवा. मी भविष्यात कोणताही प्रोजक्ट निवडताना अधिक काळजी घेईन. "

# एक फ्लॅट, दोन कुटुंब...; निर्मिती सांवतच्या 'सुपर डुपर'चा ट्रेलर प्रदर्शित

यंदाच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये प्रेक्षकांसाठी धमाल मनोरंजनाची मेजवानी घेऊन येणाऱ्या 'सुपर डुपर' या मराठी चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. नावाप्रमाणेच ट्रेलरही 'सुपर डुपर' ठरला असून प्रेक्षकांकडून त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. झी स्टुडिओज प्रस्तुत, नाईंटी नाईन प्रॉडक्शन्स आणि सिद्धिविनायक प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन समीर आशा पाटील यांनी केले आहे. हा चित्रपट येत्या ३ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.

ट्रेलर लॉंच सोहळा अत्यंत दिमाखात पार पडला. ट्रेलरमध्ये एका घराभोवती फिरणारा मजेशीर गोंधळ दाखवण्यात आला आहे. एका बाजूला परंपरांना जपणारे गावाकडील कुटुंब, तर दुसऱ्या बाजूला आधुनिक विचारसरणी असलेले शहरातील तरुण जोडपे—अशा दोन भिन्न स्वभावाच्या कुटुंबांची गोष्ट यात रंगवण्यात आली आहे. योगायोगाने एकाच फ्लॅटची विक्री या दोघांनाही होते आणि याच कारणावरून वाद निर्माण होतो. एकाच घरात राहण्याची वेळ आल्यावर त्यांच्या सवयी, विचार आणि जीवनशैलीतील फरकांमुळे अनेक विनोदी प्रसंग घडताना दिसतात.

या सगळ्या गमतीदार गोंधळात 'झाड उगायला माती आणि माणूस जगायला नाती लागतातच' हा निर्मिती सावंत यांच्या तोंडी असलेला संवाद विशेष लक्ष वेधून घेतो. विनोदासोबतच नात्यांमधील ऊब आणि भावनिक क्षणांचा सुंदर संगम ट्रेलरमध्ये पाहायला मिळतो. चित्रपटात निर्मिती सावंत, शशांक शेंडे, हृषिकेश जोशी, नम्रता संभेराव, कुशल बद्रिके, प्रतीक्षा कोते



यांच्यासह ललित प्रभाकर आणि विदुला चौगुले हे कलाकार प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत.तर, छायांकनाची जबाबदारी संजय जाधव यांनी सांभाळली आहे.

दिग्दर्शक समीर आशा पाटील यांनी सांगितले की, हा चित्रपट केवळ विनोदी नसून नात्यांमधील भावनिक बाजूही हलक्या-फुलक्या पद्धतीने मांडतो. तर झी स्टुडिओज् मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर यांनीही हा चित्रपट संपूर्ण कुटुंबाने एकत्र अनुभवावा, असा विश्वास व्यक्त केला आहे. ३ एप्रिलपासून प्रदर्शित होणारा 'सुपर डुपर' हा चित्रपट यंदाच्या उन्हाळ्यात प्रेक्षकांसाठी एक खास कौटुंबिक मनोरंजनाचा अनुभव ठरणार आहे.

# शिवआशिष मिश्राचा समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

बिग बॉस सीझन १२ मधील स्पर्धक म्हणून ओळखला जाणारा इन्फ्लुएंसर आणि अभिनेता शिवआशिष मिश्रा याचा समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्याच्या हद्दीत ही घटना घडली असून या अपघातात मिश्रा गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यासोबत असलेला सहकारी गंभीर दुखापत झाली असल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, समृद्धी महामार्गावरून प्रवास करत असताना अचानक वाहनाचा अपघात झाला. अपघात इतका भीषण होता की, मिश्रा याला गंभीर दुखापत झाली. विशेषतः त्याच्या बरगड्यांना मोठी दुखापत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले आहे. घटनेनंतर तातडीने स्थानिकांनी आणि आपत्कालीन सेवांनी मदत करत जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले.

प्राथमिक उपचारासाठी शिवआशिष मिश्रा याला कोपरगाव येथील रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याची प्रकृती पाहून पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलवण्याचा निर्णय घेतला. सध्या त्याच्यावर नागपूरमध्ये उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगितले जात आहे. या अपघातामुळे चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शिवआशिष मिश्रा हा 'बिग बॉस' सीझन १२ मधून प्रसिद्धीझोतात आला होता. त्याच्या



फिटनेसमुळे त्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधले होते. या अपघाताची माहिती समोर आल्यानंतर त्याच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.